
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३५३
www.ramprahar.com
◆ शनिवार, ११ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
खोपोली बायपासवरील दरड हटविण्यात यश/२
पनवेलमधील पावसाळी पर्यटनस्थळांवर बंदी/६
गुरुकुल अकॅडमीच्या खेळाडूंची चमक/८

## अधिवेशनाचे सूप वाजले! विधानसभेत रेकॉर्डब्रेक कामकाज



**मुंबई** : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले असून आगामी हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपूर येथे होणार आहे. दरम्यान, २२ जून ते १० जुलै या कालावधीत पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनाच्या १४ दिवसांच्या सत्रात अनेक महत्त्वाच्या लोककल्याणकारी विषयांवर सखोल चर्चा झाली. या अधिवेशनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ९ जुलै रोजी विधानसभेचे कामकाज सलग १८ तास १० मिनिटे चालून १० जुलैच्या पहाटे ३ वाजून ३९ मिनिटांनी स्थगित झाले. त्यामुळे संसदीय कामकाजाचा एक नवा विक्रम प्रस्थापित झाला. विधानसभेत १४ दिवसांमध्ये एकूण १२७ तास ५४ मिनिटे, तर विधान परिषदेत १०१ तास १० मिनिटे प्रत्यक्ष कामकाज झाले. शेवटच्या दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी सभागृहांच्या कामकाजाची सांख्यिकीय माहिती पटलावर ठेवली.

# 'त्या' शेतकऱ्यांनाही कर्जमाफी!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**




राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शुक्रवारी (दि.१०) शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला विधानसभेत उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीतील अटीशर्तींबाबत एक मोठी घोषणा केली. ज्या शेतकऱ्यांनी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेला आहे, त्या शेतकऱ्यांचे ५० हजारांऐवजी दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ होणार असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कुठल्याही कर्जमाफीने शेतकरी कधी श्रीमंत झाला नाही किंवा होऊ शकत नाही, पण त्या-त्या वेळी शेतकऱ्यांना क्रेडिटवर बनवायचे, जेणेकरून त्यांना सावकाराकडे जावे लागणार नाही, हे त्यामागचे एक उद्दिष्ट असते. मी पुन्हा एकदा सांगतो, आम्ही विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी शब्द दिला होता की आम्ही कर्जमाफी करू. कर्जमाफी देण्यासाठी २०२९पर्यंत आम्ही थांबू शकलो असतो. कारण आम्ही सर्व निवडणुका जिंकलो आहोत, मात्र आम्ही तसे केले नाही. आम्ही ठरवले की शेतकरी अडचणीत असेल तर शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली पाहिजे. त्यामुळे आपल्या सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना आपण जाहीर केली. या माध्यमातून ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटींचा लाभ देणारी ही कर्जमाफी योजना आहे. याव्यतिरिक्त दरवर्षी २५ हजार कोटी रुपये वीजमाफी सरकार देते. हे पैसे भरावे लागतात. पहिल्या वर्षी २० हजार कोटी, दुसऱ्या वर्षी २२ हजार कोटी आणि तिसऱ्या वर्षी २५ हजार कोटी रुपये आपण भरतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

ज्या शेतकऱ्यांनी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेला आहे, त्यांना आपण ५० हजार रुपयांची अट घातली होती. या माध्यमातून ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमाफी आपण म्हटले होते, परंतु आता महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही थेट दोन लाखांपर्यंत कर्जमाफी मिळेल. त्याचबरोबर २०२६-२७चा कर्ज भरण्याच्या संदर्भातील नियम वगळण्यात येईल. म्हणजे २०२६ला किती लोकांनी कर्ज भरले, तर ९५ टक्के लोकांनी भरले. त्याआधीच्या तीनपैकी दोन वर्षांत ज्यांनी पैसे भरले तेदेखील आता पात्र होतील, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

### राज ठाकरेंना जोरदार प्रत्युत्तर

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत बोलताना हिंदीतून 'भाडे के टट्टू' अशा शब्दांत खडे बोल सुनावले होते. यावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टीका केली तसेच एका मेळाव्यात बोलताना मिमिक्री केली. यावर मुख्यमंत्र्यांनी राज ठाकरे जर मिमिक्रीच्या क्षेत्रात असते, तर एकाही स्टँडअप कॉमेडियनला मार्केट राहिले नसते, अशा खोचक शब्दांत प्रत्युत्तर दिले. त्याचबरोबर विधानसभेत मी परवा भाषण केल्यानंतर अनेक लोकांना मिरच्या लागल्या आहेत. बोलता-बोलता हिंदीत बोललो की 'भाडे के टट्टू', तर मला काही जण म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी सुसंस्कृत बोलायला पाहिजे होते. त्यामुळे आता मी माझे 'भाडे के टट्टू' हे शब्द परत घेतो आणि त्याला सुसंस्कृतपणे 'भाटक गदर्भ' म्हणतो, मात्र मी तर काही सुपारीबाजांबाबत बोललो होतो. फक्त टोपी फेकली होती, तरीदेखील अनेकांना ती टोपी लागली, अशी शालजोडीतील मुख्यमंत्र्यांनी लगावली.

# महात्मा फुले जनआरोग्य योजनेत आमूलाग्र बदलांचे संकेत

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याला यश!

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील लाखो नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत लवकरच व्यापक बदल होण्याची संकेत राज्य सरकारने दिले आहेत. केवळ योजनेचा विस्तार नव्हे, तर तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी अधिक परिणामकारक करण्यासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या सुधारणांचा मुद्दा विधानसभेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून अत्यंत ठोसपणे मांडला.

राज्यातील आरोग्य व्यवस्थेतील उणिवा, रायगडसह अनेक भागांतील रुग्णालयांची कमतरता, रुग्णांचे आर्थिक शोषण आणि कर्करोग उपचारातील मर्यादा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोट ठेवले. त्यांच्या मांडणीची गंभीर दखल घेत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ३० खाटांचा निकष शिथिल करण्यापासून कर्करोग उपचार पॅकेजेस अधिक व्यापक करण्यापर्यंत अनेक महत्त्वपूर्ण सुधारणांचे आश्वासन दिले.

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अधिक प्रभावी, सर्वसमावेशक आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अधिक लाभदायी करण्यासाठी शासन आवश्यक निर्णय घेणार असल्याची घोषणा आरोग्यमंत्र्यांनी केली. त्यामुळे ही चर्चा केवळ प्रश्नोत्तरांपुरती मर्यादित न राहता राज्याच्या आरोग्य धोरणात बदल घडवून आणणारी ठरणार आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी चर्चेच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार तसेच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या विस्ताराबद्दल अभिनंदन केले. पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारकांपुरती मर्यादित असलेली योजना सर्व नागरिकांसाठी खुली करण्याचा निर्णय हा क्रांतिकारी असल्याचे त्यांनी नमूद केले, मात्र योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक आरोग्य सुविधा अद्याप अपुऱ्या असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.



### संपूर्ण महाराष्ट्रातील रुग्णांना होणार फायदा

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना सर्व नागरिकांसाठी खुली करण्याचा राज्य सरकारचा निर्णय स्वागतार्ह असल्याचे सांगतानाच आमदार प्रशांत ठाकूर यांनी "योजना सर्वांसाठी खुली झाली असली तरी उपचार देणारी रुग्णालयेच अपुरी असतील, तर त्या निर्णयाचा अपेक्षित लाभ सामान्य नागरिकांना मिळणार कसा?" असा थेट सवाल उपस्थित केला. पनवेल तालुक्यात सुमारे २४० रुग्णालये असतानाही त्यापैकी केवळ ४० रुग्णालये जनआरोग्य योजनेशी संलग्न असल्याचे त्यांनी सभागृहात निदर्शनास आणले. रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये एकही संलग्न रुग्णालय नसल्याने रुग्णांना मुंबई, नवी मुंबई किंवा पुण्याकडे धाव घ्यावी लागत असल्याचे वास्तव त्यांनी मांडले. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या लक्षवेधीची गंभीर दखल घेतली आणि महात्मा फुले जनआरोग्य योजनेमध्ये आमूलाग्र बदल करण्याचे संकेत त्यांनी दिले.

### कर्करुग्णांनाही मोठा दिलासा

कर्करोग उपचाराचा प्रचंड खर्च लक्षात घेऊन पीईटी स्कॅन (PET Scan), केमोथेरपी, रेडिएशन आणि आवश्यक शस्त्रक्रियांचा उपचार पॅकेजमध्ये समावेश करण्याची मागणीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार कर्करोग निदानासाठी अत्यंत महत्त्वाच्या PET Scan तपासणीला विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. कर्करोगाचे लवकर निदान, आधुनिक उपचारपद्धती आणि आवश्यक पॅकेजमध्ये सुधारणा करण्याची सरकारने सकारात्मक भूमिका घेत कर्करोगासह न्यूरो आणि ऑर्थोपेडिक उपचारांची पॅकेजेस अधिक व्यापक करण्याची घोषणा केली.

**३० खाटांचा निकष बदलणार**

महात्मा ज्योतिराव फुले योजनेत सहभागी होण्यासाठी असलेली ३० खाटांची अट अनेक गुणवत्तापूर्ण लहान रुग्णालयांसाठी अडसर ठरत असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. ग्रामीण आणि निमशहरी भागातील अनेक सक्षम रुग्णालये या अटीमुळे योजनेबाहेर राहिली आहेत. या निकषात शिथिलता आणण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सभागृहात स्पष्ट केले.

**रुग्णांना माहितीच मिळत नाही!**

योजनेचा लाभ मिळविण्यासाठी कोणती रुग्णालये पात्र आहेत याची माहिती नागरिकांपर्यंत पोहचत नसल्याचा मुद्दाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केला. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालये आणि सार्वजनिक ठिकाणी योजनेतील रुग्णालयांची यादी प्रदर्शित करण्याची मागणी त्यांनी केली.

**मनमानी बिलिंगवर कठोर कारवाई**

योजनेंतर्गत मोफत किंवा निश्चित दरात उपचार मिळणे अपेक्षित असताना काही रुग्णालयांकडून अतिरिक्त पैसे आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढत असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. **(पान २ वर..)**

## निवडक

### अभिनेता राजपाल यादवला तीन महिन्यांचा तुरुंगवास

**नवी दिल्ली** : मुरली प्रोजेक्टस प्रा.लि. कंपनीच्या सात चेक बाऊन्स प्रकरणात बॉलीवूड अभिनेता राजपाल यादवला दिल्ली उच्च न्यायालयाने तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. याचबरोबर प्रत्येक प्रकरणात तक्रारदाराला १.०५ कोटी रुपये, अतिरिक्त १.०४ लाख रुपये आणि ७५ हजार रुपये तसेच राज्य सरकारला २५ हजार रुपये देण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय पत्नी राधा यादवलाही प्रत्येक प्रकरणात पाच लाख ५१,३८० रुपये तक्रारदाराला देण्याचे आदेश दिले आहेत.

### मुंबईत ब्रेकफेल बेस्ट बसची १४ वाहनांना धडक; अनेक जखमी

**मुंबई :** अंधेरी पश्चिम परिसरात शुक्रवारी (दि.१०) ब्रेक निकामी झालेल्या बसने नियंत्रण सुटून सुमारे १४ वाहनांना धडक दिली. या अपघातात सहा ते आठ जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# लोकशाही बळकटीकरणासाठी 'एसआयआर' महत्त्वाचे -जिल्हाधिकारी

## पनवेलमध्ये सोसायट्यांच्या प्रतिनिधींसोबत बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मतदार यादीत नाव असणे ही आपली जबाबदारी आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अभियान महत्त्वाचे आहे. हे अभियान व्यवस्थित व आदर्शवत होण्यासाठी सोसायट्यांची गरज आहे. एसआयआर मॅपिंगमधील अडचणी दूर करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी व व्यवस्थापक यांची याकामी मदत होणार असल्याचे रायगड जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी येथे सांगितले.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या एसआयआर अभियानाच्या अनुषंगाने रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि.१०) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसोबत विशेष बैठक आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस महापालिका आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी मंगेश चितळे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सदस्य परेश ठाकूर, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, महापालिका सदस्य, सर्व पक्षांचे पदाधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी नानासाहेब कामठे, मिनल भामरे, इतर सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, महापालिका उपायुक्त व महसूल अधिकारी,कर्मचारी, गृहनिर्माण सोसायट्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना स्थायी समिती सदस्य परेश ठाकूर यांनी सांगितले की, पनवेल महापालिका क्षेत्रात स्थलांतरित मतदारांची संख्या मोठी आहे. त्यामुळे एसआयआरचे महत्त्व वाढले आहे. मतदारांमध्ये एसआयआर अभियानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे. त्याकरिता ही बैठक महत्त्वपूर्ण आहे. सर्वांनी मिळून एसआयआर अभियानाचा आलेख उंचावूया, असेही ते म्हणाले. **(पान २ वर..)**

# पाकिस्तानी गँगस्टरशी संपर्क; १० संशयित एटीएसच्या ताब्यात

**नागपूर : प्रतिनिधी**

दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) गुरुवारी रात्री महाराष्ट्रातील विदर्भात मोठी कारवाई करीत पाकिस्तानातील संघटित गुन्हेगारी टोळीशी इंटरनेटवरील समाजमाध्यमांवरून संपर्क साधल्या प्रकरणात १० जणांना ताब्यात घेतले आहे. यात नागपुरातील चार, चंद्रपूर जिल्ह्यातील तीन आणि गोंदिया, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यातील प्रत्येकी एकाचा समावेश आहे.

पाकिस्तानमध्ये संघटितपणे गुन्हेगारी करणारी शहजाद भट्टी याची टोळी सोशल मीडियातून तरुणांचा शोध घेते व संदेश पाठवते. त्यानंतर विश्वास बसताच त्यांना छोटे छोटे टास्क दिले जातात. या बदल्यात काही रक्कम ही टोळी ऑनलाइन माध्यमातून देते. याप्रकरणी एटीएसने विदर्भासह अन्य काही ठिकाणी छापे टाकल्याचे वृत्त असून अधिक तपास सुरू आहे.

दरम्यान, भारतीय तपास यंत्रणांच्या रडारवर असलेला पाकिस्तानातील संघटित टोळीचा म्होरक्या आणि दहशतवादी हस्तक शहजाद भट्टी याच्याशी संबंधित १०२ व्यक्तींची माहिती राज्याच्या एटीएसला मिळाली आहे. या सर्वांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. भट्टीच्या साथीदारांकडून भारतातील तरुणांची दिशाभूल करून त्यांना दहशतवादी कारवायांसाठी प्रवृत्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर पालकांना सावध राहण्याचे व आपल्या पाल्यावर नजर ठेवण्याचे आवाहन एटीएसने केले आहे.

## सदिच्छा भेट



**कराड (सातारा) : रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मानसिंग को-ऑप. बँक लि, दुधोंडी या शाखेस सदिच्छा भेट दिली. बँकेचे संस्थापक जे.के.(बापू) जाधव यांनी त्यांचे स्वागत व सन्मान केला. यावेळी संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, माजी सचिव जे.जे. जाधव, प्राचार्य खिलारे, प्रा. डी.ए. माने, पतंगराव कदम महाविद्यालयाच्या प्राचार्य उज्ज्वला पाटील, बोराडे, उपप्राचार्य नांगरे, शाखाधिकारी प्रकाश आरबुणे, शांताराम साळुंखे यांच्यासह बँकेचे सभासद व कर्मचारी उपस्थित होते.**

## तरुणाचा मृत्यू, ग्रामस्थांचे आंदोलन

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील भातसई येथील ३२ वर्षीय दुचाकीस्वार तरुणाचा गुरुवारी सायंकाळी ६.३०च्या सुमारास रोहा-नागोठणे मार्गावरील अष्टमी रेल्वे फाटक येथील रस्त्यावरील खड्ड्यामुळे अपघाती मृत्यू झाला. संकेत जनार्दन कोतवाल असे या तरुणाचे नाव असून तो पोलीस पाटील होता. त्याला व त्याच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी भातसई ग्रामस्थांनी शुक्रवारी (दि.१०) तीन तास धरणे आंदोलन केले.

या रस्त्यावर हा दुसरा बळी आहे. येथील सर्व्हिस रोड चांगला करावा, अशी मागणी परिसरातील गावकऱ्यांकडून होत आहे, मात्र याबाबत कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांनी ठिय्या दिला. अखेर प्रांताधिकारी कार्यालयात झालेल्या चर्चेत ठेकेदाराच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**



# ‘शाळा सुरू होण्यापूर्वीच शिक्षक बदली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नियमावली’

**मुंबई : प्रतिनिधी**

शाळा सुरू होण्यापूर्वीच शिक्षकांची पदोन्नती, समायोजन आणि बदली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नवीन नियमावली तयार करणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत दिली.विधानसभा सदस्य श्रीजया चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना ते बोलतहोते.



मंत्री गोरे म्हणाले की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यापूर्वी पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करणे.आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शिक्षक पदोन्नतीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी)उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. टीईटी संदर्भातील अनेक प्रकरणे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात

प्रलंबित असल्याने पदोन्नती आणि त्यानंतरची समायोजन प्रक्रिया विलंबाने होत आहे. यावर्षी संच मान्यता नेहमीप्रमाणे ३० सप्टेंबरपर्यंत न होता फेब्रुवारीमध्ये मिळाल्याने अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन वेळेतहोऊ शकले नाही.सध्या संबंधित जिल्हा परिषदांमध्ये प्रथम मुख्याध्यापक पदासाठी शिक्षकांच्या पदोन्नतीची प्रक्रियाराबविण्यात येत आहे. त्यानंतर अतिरिक्त जागांवर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अतिरिक्त शिक्षक समायोजनाचे अधिकार १८ मे २०११ च्या शासननिर्णयानुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे (सीईओ) आहेत. त्यामुळे संबंधित मुख्य कार्यकारीअधिकाऱ्यांना अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन लवकरात लवकर करण्याच्या सूचना देण्यात येणारअसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षक बदलीची विद्यमान प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट झाली आहे. या संदर्भातील शेकडो शासननिर्णयांमुळे प्रक्रिया अनेक टप्प्यांत ऑक्टोबरपर्यंत सुरू राहते. या प्रक्रियेत सुधारणा करण्याची आवश्यकताअसून, शासन यासाठी सर्वसमावेशक नियमावली तयार करणार आहे. शाळा सुरू होण्यापूर्वीच शिक्षकांचीपदोन्नती, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन आणि बदली प्रक्रिया पूर्ण होईल, यासाठी शासन आवश्यककार्यवाही करणार असल्याचे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले.

# खोपोली बायपास मार्गावरील दरड हटविण्यात प्रशासनाला यश



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून खोपोली एक्सिटच्या जवळ मुंबई पुणे जुना मार्गावरुन खोपोलीतील इंदिरा गांधी चौकात येणाऱ्या मार्गावर मिळगाव ठाकूर वाडी परीसरात गुरुवारी सकाळी १० वा सुमारास मातीचा ढिगारा आला होता. या घटनेने खोपोलीत येणारा मार्ग बंद झाला होता.

तो मलबा हटवण्याचा काम जेसीबी व पोकलेन मशीनच्या साह्याने युद्ध पातळीवर सुरू होते ते काम शुक्रवारी सायंकाळी ६ वा सुमारास पुर्ण करण्यात आले. हा मार्ग बंद असल्याने खोपोलीत उतरणाऱ्या वाहनांना २ दिवस सावरोली टोल नाक्यावर टोल भरुन मोठा वळसा घालत खोपोली पेण मार्गाने खोपोली व परिसरात यावे लागत होते या घटनेने खोपोली मधील वाहनांना नाहक टोलचा भुर्दंड सोसावा लागला होता.

# पोलीस पाटलाच्या मृत्यूनंतर रोहा-नागोठणे मार्गावर ठिय्या आंदोलन



**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

उड्डाणपुलाखालील रखडलेल्या जोडरस्त्याच्या निकृष्ट अवस्थेने भातसई गावचे पोलीस पाटील संकेत जनार्दन कोतवाल (वय ३२) यांचा भीषण अपघातात जागीच मृत्यू झाल्यानंतर रोहा शहरासह परिसरात संतापाची प्रचंड लाट उसळली. शेकडो ग्रामस्थ, महिला, नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांनी रोहा नागोठणे मार्गावर शुक्रवार दि. (१०) रोजी ठिय्या आंदोलन व रास्ता रोको करत प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

संकेत कोतवाल हे दुचाकीवरून रोहाकडे जात असताना रेल्वे उड्डाणपुलाखालील मोठ्या खड्ड्यात वाहनाचा तोल गेला. ते रस्त्यावर पडताच पाठीमागून येणारी एसटी बस त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर नातेवाईकांनी तब्बल १८ तास मृतदेह ताब्यात घेण्यास नकार देत संबंधित ठेकेदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची आणि कठोर कारवाईची मागणी केली.

आंदोलनादरम्यान नागरिकांनी सामाजिक जबाबदारीचे भान राखत शाळकरी विद्यार्थ्यांची वाहने, रुग्णवाहिका आणि अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देणाऱ्या वाहनांना मार्ग मोकळा करून दिला.स्थानिकांच्या मते, गेल्या चार वर्षांपासून रोहाअष्टमी रेल्वे उड्डाणपूल आणि जोडरस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. अपुरी सुरक्षा व्यवस्था, मोठमोठे खड्डे, अरुंद रस्ता, दिशादर्शक फलकांचा अभाव, रिफ्लेक्टिव्ह बोर्ड नसणे आणि रात्री अपुरा प्रकाश यामुळे या मार्गावर वारंवार अपघात होत असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे. तरीही संबंधित यंत्रणांनी कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला.

दरम्यान, आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या मान्य करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले, मात्र प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी झाली नाही, तर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. संबंधित यंत्रणांनी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी आता मागणी होत आहे.

# वावर्ले गावात जुगार अड्ड्यावर छापा; पाच जण ताब्यात

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक पोलीस दूरक्षेत्र हद्दीत वावर्ले गावात तीन पत्ती जुगार खेळणाऱ्या पितांबर नरसू मोरे वय ५० ,प्रमोद किसन विचारे ३४, नरेश अनंत येवले ४०, एकनाथ परशुराम पार्टी ३३, सर्व वावरले व राजेश सुरेश चौधरी ५१ रा. चौक यांना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग रायगड आणि खालापूर पोलिसांनी छापा टाकून रंगेहाथ पकडले.

वावर्ले गावात पितांबर मोरे यांच्या घरात बेकायदेशीर रित्या तीन पत्ती जुगार खेळत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग रायगडचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना खबऱ्या मार्फत मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे बुधवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पोलीस पथकाने वावरले गावात छापा टाकला असता पितांबर मोरे यांच्या घरात दुसऱ्या मजल्यावर तीन पत्ती जुगार खेळताना पाचही आरोपी आढळून आले. त्यांच्याजवळ जुगारासाठी लागणारे साहित्य आणि रोख २९ हजार रुपये पोलिसांनी जप्त केले आहेत. खालापूर पोलीस ठाण्यात पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.



**पेण : तालुक्यातील काऊजीवाडी येथे ५ जुलै रोजी भूस्खलनाची घटना घडली. या घटनेत वाडीतील दोन घरांचे नुकसान झाले असून वाडीत १६ कुटुंब राहत आहेत. बाधित नागरिकांच्या रात्रीच्या निवाऱ्याची व्यवस्था स्थानिक समाजमंदिरात करण्यात आली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. कंपनीतर्फे मदत करण्यात आली. यावेळी टीआयपीएलचे स्वप्नील ठाकूर, कामार्ली मंडळ अधिकारी किरण जुईकर, पोलीस पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.**

# सीवूड्समध्ये सोसायटीत स्लॅब कोसळून एक जण जखमी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीवूड्स सेक्टर-४८ येथील साईप्रसाद सोसायटी, डी-५, रूम क्र. ८ येथील रहिवासी सुरेश साळुंखे यांच्या घराच्या छतावरील स्लॅबचा मोठा भाग गुरुवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास अचानक कोसळला. या दुर्घटनेत त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांना तातडीने डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, सीवूड्स सेक्टर-४८ तसेच इतर सिडकोनिर्मित इमारतींचे त्वरित स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे. धोकादायक इमारतींची पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर हाती घ्यावीत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशी मागणी स्थानिक नगरसेवक विशाल विचारे यांनी नवी मुंबई मनपाकडे केली आहे.

# नागोठण्यात अग्निशमन दलाकडून बाजारपेठ व कोळीवाड्याची स्वच्छता

**नागोठणे : बातमीदार**

पूरग्रस्त नागोठण्याची गुरुवारी पाहणी करताना कोकण विधानपरिषदेचे आमदार अनिकेत तटकरे यांनी परिसरात साचलेली घाण व दुर्गंधी पाहून रोगराईचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी तातडीने स्वच्छता करण्याचे निर्देश रिलायन्स व सुप्रिम कंपनीला दिले होते . राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोरभाई जैन यांनी या निर्देशांचा पाठपुरावा केल्यानंतर शुक्रवारी सकाळी दोन्ही कंपन्यांच्या अग्निशामक दलाने नागोठणे बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कोळीवाडा तसेच नुक्कड गल्ली परिसरात पाण्याचा मारा करून स्वच्छता केली.




या मोहिमेदरम्यान राष्ट्रवादीचे नेते किशोर जैन, नरेंद्रशेठ जैन, भाईसाहेब टके, शहराध्यक्ष बाळासाहेब टके, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाशशेठ जैन, अनिलशेठ काळे, जुगनशेठ जैन, शैलेश रावकर, सिराज पानसरे, पुनम काळे, मनोज टके, प्रथमेश काळे, ॲड. श्रीकांत रावकर, विजय शहासने, बिपीन सोष्टे, बंटी चोपडा, किरण काळे व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वावेहवेली धरण झाले फुल्ल! पर्यटकांची पावले धबधब्याकडे

**तळा : प्रतिनिधी**

गेल्या पाच ते सहा दिवसांपासून पडलेल्या मुसळधार पावसाने वावेहवेली धरण भरले असून धबधबे वाहण्यास सुरूवात झाली आहे.तसेच तालुक्यातील ही अनेक ठिकाणी हे धबधबे वाहण्यास सुरूवात झाल्याने पर्यटकांची पावले या धबधब्यांकडे वळण्यास सुरूवात झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



तळा तालुक्यात धबधब्यांचे आकर्षण वाढत असल्याने शनिवार,रविवार धबधबे होतात फुल. गोवा - मुंबई हायवे पासून ११ की.मी. अंतरावर वावेहवेली धरण आहे या वावेहवेली धरण क्षेत्रातील धबधबे पर्यटकांसाठी एक पर्वणी आहे.या धबधब्या बरोबरच तळेगाव, गायमुख भागातही धबधब्यांवर पर्यटकांची वर्दळ दिसत आहे.

कुडालेणी, तळगड, तळा तालुका हा एक निसर्गाचा मोठा साठा आहे त्यात पावसाळा सुरु झाल्याने धबधबे वाहू लागले असून धरणे फुल झाली आहेत.तालुक्यात अनेक ठिकाणी छोटे मोठे धबधबे व धरणावरील निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी कॉलेज कुमार ते पर्यटक मोठ्या संख्येने रविवारी येतात व निसर्गाचा आनंद लुटून जातात .वावेहवेली येथील धरणात पावसाळ्यात जास्त होणारा पाणी (ओव्हरफ्लो) काढण्यासाठीचा जो भाग आहे त्या पाण्याच्या स्रोतावरती येणारे पर्यटक व तरुण मौजमजा करत पोहत उड्या मारत असतात व मनमुराद आनंद लुटत असतात .

कुंबेटचा धबधब्यावर मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होताना पहावयास मिळत आहे.यामुळे येथील नागरिकांना येणारे पर्यटक जेवणाची ऑर्डर देत असतात तर काही तळा शहरातून जेवण व इतर खाद्यपदार्थ नेत असतात त्यामुळे येथील नागरिकांच्या हाताला काही दिवस काम मिळत असते, तळेगावचा धबधबा व बोरीच्या माळचा धबधबा ही नावारुपाला येत असून मालाठेवाडी, मालुक याभागातही पर्यटनाला चालना देणारे धबधबे असून या धबधब्यावरती एक ते दिड कि. मी. अंतर चालत जावे लागते. या ठिकाणी तळीराम मात्र न चुकता धबधब्यांवरती रविवारी मजा लुटण्यासाठी जात असतात.

तालुक्यातील तळेगाव जवळील धोदानी हे ठिकाण त्यांच्यासाठी एक पर्वणीचआहे निसर्गाच्या नयनरम्य अशा झाडीवेलींतून डोंगरावरुन कोसळणाऱ्या रमणीय धोदानी धबधब्यावर वर्षा सहलीचा आनंद लुटण्यासाठी येथे दुरवरुन पर्यटक येत असतात.

पान १ वरुन

## महात्मा फुले जनआरोग्य योजनेत आमूलाग्र बदलांचे संकेत

त्यांनी योजनेतील संलग्न रुग्णालयांची अद्ययावत माहिती प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालये आणि सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध करून देण्याची तसेच योजनेतील रुग्णांकडून नियमबाह्य अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यावर मंत्री आबिटकर यांनी हा विषय अत्यंत गंभीर असल्याचे सांगत बॉम्बे नर्सिंग ॲक्ट, महाराष्ट्र नर्सिंग ॲक्ट तसेच प्रस्तावित क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट अंतर्गत आवश्यक नियम अधिक स्पष्ट केले जाणार असल्याची माहिती दिली.

संबंधित विधेयक संयुक्त समितीकडे असून अंतिम नियमावली तयार झाल्यानंतर रुग्णालयांना अधिक पारदर्शकपणे काम करावे लागेल आणि रुग्णांचे हित अधिक प्रभावीपणे संरक्षित केले जाईल, त्या अनुषंगाने कायद्यांतर्गत कठोर नियम लागू करून मनमानी बिलिंग करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही आरोग्यमंत्र्यांनी दिली.

**स्वयंसेवी संस्थांनाही मिळणार भूमिका**

कर्करोग क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्था आणि 'कॅन्सर मित्र' यांना शासनाच्या धोरण प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची अभिनव सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. रुग्णांचे प्रत्यक्ष अनुभव धोरणनिर्मितीत उपयुक्त ठरतील, असे त्यांनी सांगितले.

**आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा**

विधानसभेत महात्मा फुले जन आरोग्य योजनेविषयक या चर्चेचे वैशिष्ट्य म्हणजे राज्यातील आरोग्य व्यवस्थेतील उणिवा दूर करून नागरिकांना अधिक सुलभ, परवडणारी आणि पारदर्शक आरोग्यसेवा कशी मिळेल यावर भर देण्यात आला. त्यामुळे पनवेल रायगडच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील रुग्णांना त्याचा फायदा होणार आहे.

## लोकशाही बळकटीकरणासाठी ‘एसआयआर’ महत्त्वाचे -जिल्हाधिकारी

उपस्थित सोसायटी पदाधिकाऱ्यांना एसआयआर प्रक्रिया कशी चालते, मतदारांना एसआयआर अंतर्गत स्वगणना करताना voters.eci.gov.in किंवा ECINet Appवर जाऊन स्वतःचा तसेच कुटुंबातील सदस्यांचा मतदार यादीतील तपशील तपासतानाचे विविध टप्पे, बीएलओच्या माध्यमातून ऑफलाइन पद्धतीने केले जात असलेले एसआयआरचे काम याबाबतचे सविस्तर सादरीकरण यावेळी नायब तहसीलदार संभाजी शेलार यांनी केले.

बैठकीचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी, तर सूत्रसंचलन उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी केले. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व मतदार, संबंधित अधिकारी, बीएलओ, बीएलए या सर्वांनी समन्वय राखून आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आजपासून दोन दिवस ‘अंबुद’ पावसाळी उत्सव

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वामीराज प्रकाशन आणि पल्लवी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी आयोजित होणारा "अंबुद" हा पावसाळी साहित्य, सांस्कृतिक उत्सव शनिवार ११ जुलैपासून सुरू होत आहे. चहा, कांदा भजी आणि बरंच काही घडवणारा अशा या उत्सवाचे यंदा चौथे वर्ष आहे. दरवर्षी जुलै महिन्यात दुसऱ्या आणि चौथ्या शनिवार, रविवारी हा उत्सव साजरा केला जातो. नेहरू नगर कुर्ला पूर्व येथील प्रबोधन प्रयोगघर येथे हा उत्सव साजरा होतो.

यंदाच्या उत्सवाचे उद्घाटन शनिवार ११ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून पत्रकार व नाटकवाल्यांचा हक्काचा माणूस बबन केमकर अर्थात बबन चहावाला याच्या हस्ते उद्घाटन होईल, तर छत्रपती शिवाजी महाराज मंदिर नाट्यगृहातील प्रसिद्ध वडेवाला शांताराम महाडिक या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी असतील. त्यानंतर ‘दै. राम प्रहर’चे संपादक देवदास मटाले या दोघांची मुलाखत घेणार आहेत. या मुलाखतीनंतर ७ वाजता "तुझ्या डोळ्यात पावसाचा मेघ" हा खास पावसाळी कविता, गझलांचा कार्यक्रम सादर होईल. ज्येष्ठ गझलकार दिलीप पांढरपट्टे, छाया कोरेगावकर, जितेंद्र लाड, स्वाती शुक्ल हे सहभागी होणार असून सूत्रसंचालन वृषाली विनायक करतील.

रविवार १२ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता मराठी चित्रपट महामंडळ निवडणुकीत विजयी झालेले सुशांत शेलार, सुभाष नकाशे आणि गणेश गारगोटे यांचा खास सत्कार होणार असून त्यानंतर "मराठी चित्रपट चितपट होतोय का?" या विषयावर संगीतकार, चित्रपट आस्वादक ओमकार इनामदार या तिघांशी संवाद साधणार आहे. ७ वाजता तपस्या नेवे आणि दीपाली केळकर यांचा " गंध पावसाचा, रंग भाषांचा" हा आगळा वेगळा कार्यक्रम सादर होईल.

## दुखवटा

### चंद्रभागा म्हात्रे



**पेण :** तालुक्यातील वढाव येथील चंद्रभागा पांडुरंग म्हात्रे यांचे वयाच्या १०० व्या वर्षी निधन झाले. त्यांनी ६० वर्षांपूर्वी वढावच्या प्राथमिक शाळेला वर्ग खोल्यांसाठी सुमारे १५ गुंठे जमीन योगदान म्हणून दिली होती. त्यांच्याच प्रेरणेने त्यांच्या परिवाराने २००० साली वढाव येथे वीरभद्र देवस्थानसाठी स्वतःची जागा मंदिरासाठी दिली. त्यांच्या पश्चात दोन मुले पाच मुली व सुना नातवंडे असा परिवार आहे त्यांचे दिवसकार्य वढाव येथे सोमवारी १३ जुलै रोजी होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबियांकडून सांगण्यात आले.

### अर्जुन पाटील



**उलवे नोडः** मोरावे गावचे सामाजिक कार्यकर्ते अर्जुन भोकाजी पाटील यांचे गुरुवारी (ता. ९) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. ते ज्येष्ठ पत्रकार कृष्णा पाटील यांचे वडील होत. दिवंगत अर्जुन पाटील यांच्यावर मोरावे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा होम विधी शनिवारी (ता. ११) सकाळी ९.३० वाजता मोरावे गावातील ‘अर्जुन भवन’ येथे करण्यात येणार आहे. तसेच त्यांचा दशक्रिया विधी शनिवार, १८ जुलै रोजी लांगेश्वर येथे, तर उत्तरकार्य मंगळवार, २१ जुलै रोजी ‘अर्जुन भवन’, मोरावे येथे करण्यात येणार आहे.

# कळंबोलीत ड्रग्जमाफियाच्या शेडवर बुलडोझर

## महापालिकेची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहतीमधील ड्रग्जमाफिया वसीम लुंगीच्या कथित साम्राज्यावर अखेर प्रशासनाने धडक कारवाई केली आहे. कळंबोली वसाहतीतील झोपडपट्टी परिसरात शेळीपालनाच्या नावाखाली उभारण्यात आलेले अनधिकृत शेड पनवेल महानगरपालिकेने जमीनदोस्त केले. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.



पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार प्रभाग अधिकारी सुबोध ठाणेकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. प्रभाग अधीक्षक अरविंद पाटील यांच्यासह पालिकेच्या अतिक्रमण विभागाने मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली. या अनधिकृत बांधकामाविरोधात समाजसेविका प्रियंका गाडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यांच्या तक्रारींची दखल घेत पालिकेने अखेर कठोर कारवाई केली. यापूर्वी नार्कोटिक्स विभागाचे अधिकारी संदीप निगडे यांच्या पथकाने वसीम लुंगीविरोधात अमली पदार्थप्रकरणी कारवाई केली होती.

अतिक्रमण हटाव कारवाईवेळी निगडे यांची उपस्थितीही चर्चेचा विषय ठरली. या कारवाईनंतर स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. अमली पदार्थांच्या अवैध व्यवहारांना आश्रय देणाऱ्या सर्व अनधिकृत बांधकामांवर अशाच प्रकारे कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. पालिकेच्या या धडक मोहिमेमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# जमीन फसवणुकीतील सराईत आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

जमिनीच्या अफरातफरी प्रकरणातील सराईत आरोपीला पनवेल तालुका पोलिसांनी दूधनाका, कल्याण (जि. ठाणे) येथे सापळा रचून अटक केली आहे. पनवेल तालुक्यातील मौजे पाले बुद्रुक येथील गट सर्व्हे नं. ९८/३, क्षेत्र ३.७५ हेक्टर ही जागा तक्रारदार आणि त्यांच्या भावाच्या मालकीची व ताब्यात होती. तक्रारदारांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर सराईत आरोपी मन्सूर उमर अंतुले (५५, रा. कल्याण) याने दोघांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने सदर जागेचे बनावट नोटरी कुलमुखत्यारपत्र व बनावट नोटरी खरेदीखत तयार केले.

त्यावर तक्रारदार व त्यांच्या वडिलांच्या बनावट सह्या तसेच बनावट अंगठ्याचे ठसे लावून जागेत अनधिकृत अतिक्रमण केले. स्वतःचे बोर्ड लावून तेथे बांधकामाचे साहित्य टाकून बांधकाम सुरू केल्याची माहिती तक्रारदारांना मिळताच त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक शेळके, पोलीस उपनिरीक्षक गणेश मोकाशी, पोलीस हवालदार शिवाजी बाबर, पोलीस हवालदार वैभव पाटील, पोलीस शिपाई आकाश भगत, महिला पोलीस शिपाई स्नेहल लावंड यांनी आरोपीचा शोध घेतला.

पुरावे निष्पन्न झाल्यानंतर दूधनाका, कल्याण येथे सापळा रचून मन्सूरला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेला मोबाइल फोनही हस्तगत करण्यात आला आहे. तपासात आरोपीविरुद्ध ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत फसवणूक आणि बनावटीकरणाचे गुन्हे आधीच दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# सीकेटी कॉलेजमध्ये सोमवारी विद्यार्थी गुणगौरव; मान्यवरांची लाभणार उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष पदवी, पदव्युत्तर वर्गातील व पीएचडी पुरस्कृत गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा सोमवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रेरणास्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून साजरा करण्यात येणार आहे.

साधेपणा, तत्त्वनिष्ठा आणि समर्पणाचे प्रेरणादायी उदाहरण असलेल्या स्व. चांगू काना ठाकूरसाहेबांच्या स्मरणार्थ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेल परिसरातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या उद्देशाने या महाविद्यालयाची स्थापना केली. दरवर्षी त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याची परंपरा जपली जाते. विविध परीक्षांमध्ये गुणवंत यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे उत्कृष्ट शैक्षणिक कार्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर भूषविणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. कविता लघाटे आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित राहणार आहेत. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, नगरसेवक व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर तसेच संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

सोहळ्यात सर्व पालक व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाचे चेअरमन डॉ. एस. एन. परकाळे, समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव व महिला विकासच्या चेअरमन डॉ. आर. डी. म्हात्रे विशेष प्रयत्न करत आहेत.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ओरिएंटेशनद्वारे करिअर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि. १०) सकाळी १० वाजता वाणिज्य व विज्ञान शाखेच्या संयुक्त विद्यमाने प्रथम वर्षाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी ओरिएंटेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या ओरिएंटेशनसाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे उपस्थित होत्या.



त्यांनी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात राबविले जाणारे सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम, विविध अभ्यासक्रम, उपस्थितीचे महत्त्व, प्लेसमेंट ड्राईव्ह तसेच विविध नामांकित संस्थांसोबत असणारे सामंजस्य करार व त्यातून होणारे ज्ञानाचे आदान-प्रदान याबाबत माहिती दिली. शिस्त, वेळेचे पालन आणि शैक्षणिक उद्दिष्टे यांविषयीही मोलाचे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक प्रा. प्रथमेश उदेकरही उपस्थित होते.

या ओरिएंटेशन प्रोग्रामचे आयोजन व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागप्रमुख प्रा. डॉ. रीत ठुले, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. विशाल देशमुख, अकाउंट व फायनान्स विभागप्रमुख प्रा. प्रवर शर्मा, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. नीलम लोहकरे, संगणक विभागप्रमुख प्रा. रिजवाना मोमीन आणि माहिती व तंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. राजश्री म्हात्रे यांनी केले. कार्यक्रमाला दोन्ही शाखांतील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# वाजेकर कॉलेजमध्ये स्लोगन स्पर्धेतून स्वच्छतेचा संदेश

**उरण : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत अभियानाची संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी आणि स्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांच्या वतीने तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे स्वच्छतेविषयक स्लोगन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



स्पर्धेत इयत्ता बारावीच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील एकूण ४७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सार्वजनिक आरोग्य, प्लास्टिकमुक्त परिसर, कचरा व्यवस्थापन आणि वैयक्तिक स्वच्छता या विषयांवर आकर्षक, आशयघन आणि जनजागृतीपर घोषवाक्ये तयार केली. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्लोगन्समध्ये "विद्यार्थ्यांनी एक पाऊल स्वच्छतेकडे, समृद्धी येईल आपल्याकडे", "स्वच्छता पाळा, रोगराई टाळा", "Green and Clean Earth Will Bless You With a Longer Life", "स्वच्छ भारताची ओळख, प्रत्येक नागरिकाची जबाबदारी" यांसारखे प्रेरणादायी संदेश होते.

या स्लोगन्सचा वापर शाळा, कुटुंब तसेच समाजामध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी सकारात्मक दृष्टिकोन विकसित झाला. सार्वजनिक ठिकाणे, शैक्षणिक संस्था आणि घराचा परिसर स्वच्छ ठेवण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. स्वच्छता ही केवळ वैयक्तिक सवय नसून सामाजिक बांधिलकी आहे, हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला. सदर स्पर्धा शाळा समितीचे चेअरमन कृष्णाजी कडू

### ४७ विद्यार्थ्यांचा सहभाग

आणि विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली. स्पर्धेचे नियोजन व आयोजन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. राजू खेडकर यांनी केले.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर प्रा. किशोर पाटील, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबूलाल पाटोळे, सायन्स विभागप्रमुख झुंझार माने, कॉमर्स विभागप्रमुख ऋषिकेश धुरी, कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण विकसित होतात, असे मत व्यक्त करण्यात आले.

# वनहक्कधारकांच्या जमिनी आता नियमित सातबारावर

## शासनाच्या निर्णयाचे स्वागत

**पनवेल : वार्ताहर**

वनवासी कल्याण आश्रमाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. वनहक्क कायद्यांतर्गत लाभार्थी आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनींची सातबारा उताऱ्यावर पूर्ण नोंद करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाचे वनवासी कल्याण आश्रमाने स्वागत केले आहे. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे वनवासी कल्याण आश्रमाचे प्रांत अध्यक्ष विष्णू सुरुम यांनी अभिनंदन केले आहे.

यापूर्वी वनहक्क कायद्यांतर्गत पात्र आदिवासी शेतकऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या जमिनींची नोंद सातबारा उताऱ्यावरील "इतर हक्क" या सदरात करण्यात येत होती. मात्र शासनाच्या नव्या निर्णयानुसार या जमिनींची नियमित सातबारा उताऱ्यावर पूर्णपणे नोंद करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे वनहक्कधारक आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवरील मालकी हक्क अधिक सक्षमपणे सिद्ध करता येणार आहे. त्याचबरोबर विविध शासकीय योजनांचा लाभ घेणेही सुलभ होणार आहे. कृषी कर्ज, सिंचन सुविधा, पीकविमा तसेच इतर विकासात्मक योजनांचा लाभ आदिवासी शेतकऱ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचण्यास मदत होईल. आदिवासींच्या प्रगतीसाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत विष्णू सुरुम यांनी व्यक्त केले.

# कळंबोलीतील शाळेत सापाचे पिल्लू

## सर्पमित्राकडून बचावकार्य



**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीतील सेक्टर १० मधील न्यू मुंबई इंग्लिश स्कूलच्या तळमजल्यावर सापाचे पिल्लू दिसून आल्याने सकाळी शाळेत एकच गडबड उडाली. यामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण होते, मात्र सर्पमित्र गणेश वत्रे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत सापाला सुरक्षितरित्या पकडून नैसर्गिक अधिवासात सोडले.

सकाळी शाळेच्या इमारतीच्या तळमजल्यावर अडीच फूट लांबीचे सापाचे पिल्लू आढळून आले. ही बाब लक्षात येताच शाळा प्रशासनाने त्वरित कळंबोलीतील सर्पमित्र गणेश वत्रे यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच गणेश वत्रे यांनी शाळेत धाव घेत लपून बसलेले धामण जातीचे सापाचे पिल्लू कौशल्याने पकडले. त्यानंतर त्यांनी ते बाटलीत बंद करून सुरक्षित ठिकाणी नेऊन मुक्त केले. शाळेच्या बाजूलाच उद्यान असल्यामुळे या परिसरात धामण जातीच्या सापांची पिलावळ असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे सर्पमित्रांनी सांगितले.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा परिसराची योग्य तपासणी करून परिसर स्वच्छ ठेवावा, असा सल्ला सर्पमित्र गणेश वत्रे यांनी दिला आहे.

# नाल्यातील प्लास्टिक बाटल्या आणि कचऱ्यामुळे भाजी मार्केटमध्ये पाणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल भाजी मार्केट परिसरातील पाणी रस्त्यावर वाहू लागल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला. या परिस्थितीला नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर फेकण्यात आलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि कचरा कारणीभूत असल्याचे स्वच्छता मोहिमेदरम्यान स्पष्ट झाले. पाणी पिऊन झाल्यानंतर अनेक नागरिक प्लास्टिकच्या बाटल्या थेट नाल्यांमध्ये फेकत आहेत. त्यामुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळ येत असून नाले तुंबत आहेत.

ही समस्या लक्षात घेऊन पनवेल महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्नाळा सर्कल परिसरातील नाल्यांची तातडीने साफसफाई करण्यात आली. या मोहिमेत नाल्यातून हजारो प्लास्टिकच्या बाटल्या आणि मोठ्या प्रमाणात कचरा बाहेर काढण्यात आला. पालिकेकडून सातत्याने स्वच्छता आणि जनजागृती मोहीम राबविली जात असली तरी काही नागरिकांच्या निष्काळजीपणामुळे शहरासमोर गंभीर समस्या निर्माण होत आहेत. नाले तुंबल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचते आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. प्लास्टिकच्या बाटल्या आणि कचरा कचऱ्याच्या डब्यातच टाकावा, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

# डॉ. पूर्वी कुट्टी यांना धन्वंतरी पुरस्कार

## बालरक्तविकार क्षेत्रातील कार्याचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

बालरक्तविकार, बालकर्करोग आणि बोन मॅरो प्रत्यारोपण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल वाशीतील न्युईरा हॉस्पिटलच्या वरिष्ठ बालरक्तविकार, बालकर्करोगतज्ज्ञ आणि बोन मॅरो प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. पूर्वी कुट्टी यांना 'मुंबई समाचार धन्वंतरी पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

बालरक्तविकार, कर्करोग आणि इतर गुंतागुंतीच्या आजारांनी ग्रस्त मुलांवर अत्याधुनिक उपचार, वैद्यकीय कौशल्य आणि रुग्णकेंद्रित सेवेद्वारे त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांत डॉ. कट्टी यांनी जीवघेण्या रक्तविकार आणि कर्करोगाने ग्रस्त असंख्य बालरुग्णांवर यशस्वी उपचार केले आहेत. उपचारांसोबतच रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक आधार देत त्यांना आत्मविश्वास मिळवून दिला. बोन मॅरो प्रत्यारोपण आणि बालरक्तविकार उपचारातील त्यांच्या विशेष प्राविण्यामुळे अनेक मुलांना नवे आयुष्य मिळाले आहे.



पुरस्कारानंतर डॉ. पूर्वी कुट्टी म्हणाल्या की, हा पुरस्कार माझ्यासाठी माझ्या कामाची पोचपावती आहे. हा केवळ माझा नसून प्रत्येक डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेवेसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या संपूर्ण टीमच्या समर्पणाचे प्रतीक आहे. प्रत्येक मुलाला वेळीच निदान, अत्याधुनिक उपचार आणि उत्तम आरोग्यसेवा मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. एखादे मूल पूर्णपणे बरे होऊन पुन्हा शाळेत जाताना आणि आनंदी जीवन जगताना पाहणे, हेच कोणत्याही डॉक्टरसाठी सर्वात मोठे समाधान आहे. हा सन्मान मला अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा देईल. हा सन्मान भारतामध्ये बालरक्तविकार, बालकर्करोग आणि बोन मॅरो प्रत्यारोपणासारख्या विशेष उपचारसेवांचे वाढते महत्त्व अधोरेखित करतो. देशभरातील अधिकाधिक बालरुग्णांना दर्जेदार उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी जनजागृती, संशोधन, नावीन्यपूर्ण उपचार पद्धती आणि विशेष वैद्यकीय सेवांचा विस्तार करण्याची गरजही या पुरस्काराच्या निमित्ताने अधोरेखित करण्यात आली.

## संपादकीय

# पुन्हा युद्धाची सावली

अमेरिका आणि इराण यांच्या दरम्यान पुन्हा व्यापक युद्ध झाल्यास त्याची आर्थिक, राजकीय आणि मानवी किंमत प्रचंड असेल. वारंवार होणारे हल्ले आणि वाढता तणाव यामुळे चुकीच्या आकलनातून संघर्ष अचानक मोठ्या युद्धात परिवर्तित होण्याचा धोका नाकारता येत नाही. म्हणूनच या देशांमध्ये नव्याने पेटलेला संघर्ष मर्यादित राहणार की पुन्हा एकदा जगाला व्यापक युद्धाच्या उंबरठ्यावर नेणार याकडे आज अवघ्या जगाचे लक्ष लागले आहे.

**अमेरिका आणि इराण यांच्यातील ताज्या हवाई हल्ल्यांनी पश्चिम आशियात पुन्हा युद्धाचे ढग दाटून आले आहेत. काही आठवड्यांपूर्वी संघर्ष शमल्याने पुन्हा शांतता प्रस्थापित होण्याची आशा निर्माण झाली होती. मात्र नव्या हवाई हल्ल्यांमुळे परिस्थिती पुन्हा गंभीर बनली आहे. हा संघर्ष पुन्हा व्यापक प्रादेशिक युद्धात परिवर्तित होण्याच्या चिंतेने जगाला ग्रासले आहे. पुन्हा युद्ध सुरू झाल्यास त्याचे परिणाम केवळ दोन देशांपुरते मर्यादित राहणार नाहीत. तेलाच्या किमती, जागतिक व्यापार, आर्थिक स्थैर्य आणि आंतरराष्ट्रीय राजकारण या सर्वांवर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. आखाती देश, सामुद्रधुनीतील व्यापारी जहाजे आणि ऊर्जा पुरवठ्याशी संबंधित मार्ग या सर्वांवर या तणावाचा थेट परिणाम होऊ शकतो. जगातील तेल वाहतूक मोठ्या प्रमाणात इराणजवळील होर्मूझ सामुद्रधुनीतून होते. त्यामुळे या सामुद्रधुनीत कोणताही अडथळा निर्माण झाल्यास त्याचा परिणाम भारतासह ऊर्जा आयात करणाऱ्या अनेक देशांवर होऊ शकतो. तेलाच्या किंमती वाढल्या की वाहतूक, अन्नधान्य, खते, उद्योग उत्पादन आणि इतर वस्तूंचा खर्च वाढतो. पर्यायाने सर्वसामान्यांच्या दैनंदिन खर्चात वाढ होते. भारताच्या तर ऊर्जेच्या गरजेचा मोठा भाग मध्यपूर्वेतील तेलावर अवलंबून आहे. तसेच लाखो भारतीय नागरिक आखाती देशांमध्ये कार्यरत आहेत. त्या भागांतील भारतीयांच्या सुरक्षेची चिंताही भारताला वाटते आहेच. त्यामुळे भारताने संतुलित परराष्ट्र धोरण कायम ठेवत शांततेचे आवाहन करणे, आपल्या नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे आणि ऊर्जा सुरक्षेसाठी पर्यायी उपाय अधिक बळकट करणे आवश्यक आहे. मध्यपूर्व हा जागतिक व्यापाराचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. संघर्ष वाढल्यास पुन्हा समुद्री वाहतूक आणि पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम विविध वस्तूंच्या उपलब्धतेवर आणि किंमतींवर होऊ शकतो. सुरक्षेच्या कारणास्तव अनेक विमान कंपन्या संघर्षग्रस्त प्रदेश टाळतात. त्यामुळे हवाई मार्ग लांब होतात, इंधनाचा खर्च वाढतो आणि तिकीट दर वाढण्याची शक्यता निर्माण होते. युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली की गुंतवणूकदार सावध होतात. त्यामुळे जागतिक तसेच भारतीय शेअर बाजारात चढ-उतार वाढू शकतात. त्याचाही फटका छोट्या गुंतवणूकदारांना अधिक बसतो. जागतिक व्यवस्था आज अनेक संघर्षांनी आधीच तणावाखाली आहे. अशा वेळी अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा संघर्ष पेटणे हे कोणाच्याही हिताचे नाही. त्यामुळे सध्या संपूर्ण जग पुन्हा पेटलेल्या अमेरिका-इराण संघर्षाकडे अतिशय चिंतेने पाहत आहे. अमेरिका आणि इराण या दोघांनाही मोठे युद्ध नको आहे असे जगभरातील बहुतांश तज्ज्ञांचे मत आहे. परंतु दोन्ही बाजूंमधील संवादाची दारे बंद झाली तर त्यांच्यातील संघर्षाची किंमत संपूर्ण जगाला मोजावी लागू शकते. दीर्घकालीन स्थैर्य केवळ संवाद, परस्पर विश्वास आणि राजनैतिक तोडग्यांतूनच मिळू शकते. त्यामुळे युद्धाच्या सावलीत उभ्या असलेल्या जगाने आता संघर्षाच्या नव्हे तर शांततेच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकण्याची गरज आहे.**

# बळीराजाची कर्जमुक्तीकडे वाटचाल!

"शेतकरी जगला तरच जग जगेल" ही केवळ भावना नाही, तर आपल्या देशाच्या अस्तित्वाची खरी ओळख आहे. कारण शेतकरी हा केवळ अन्नदाता नाही; तो राष्ट्राचा जीवनदाता आहे. उन्हाची तिरीप, पावसाची अनिश्चितता, वादळाचे संकट, किडींचा प्रादुर्भाव आणि बाजारातील चढ-उतार या सर्वांशी दोन हात करत तो प्रत्येक हंगामात नव्या आशेचे बी पेरत असतो. त्याच्या हातात असलेली मूठभर बियाणे ही केवळ धान्याची नसतात; ती त्याच्या मुलांच्या शिक्षणाची, कुटुंबाच्या आनंदाची, आई-वडिलांच्या औषधांची, घराच्या स्वप्नांची आणि उद्याच्या उज्ज्वल भविष्याची बीजे असतात. धानाचे एक छोटेसे रोप शेतात उभे राहताना अनेक संघर्षांची साक्ष देत असते.



त्या रोपामागे असतो शेतकऱ्याचा घाम, कष्ट, संयम आणि निसर्गावरचा अढळ विश्वास. म्हणूनच धानाची शेती ही फक्त शेती नसून ती जीवन जगण्याची एक संस्कृती आहे. शेतकऱ्याच्या हातातील प्रत्येक रोप हे त्याच्या आशेचे प्रतीक असते. पावसाच्या प्रत्येक सरीसोबत त्याची स्वप्नेही रुजत असतात आणि कणसांमध्ये त्याच्या कष्टांचे सोनं दडलेले असते.

मात्र आज शेतीसमोर अनेक नवीन आव्हाने उभी आहेत. हवामान बदलामुळे पावसाचा लहरीपणा वाढला आहे. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, कधी रोग-किडींचा प्रादुर्भाव तर कधी उत्पादन खर्चात सातत्याने होणारी वाढ या सगळ्याचा सर्वाधिक परिणाम शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीवर होत आहे. अनेकदा वर्षभराच्या कष्टानंतरही अपेक्षित उत्पादन मिळत नाही आणि शेतकरी पुन्हा कर्जाच्या ओझ्याखाली दबला जातो. पण संकट कितीही मोठे असले तरी आशा संपत नाही. कारण भारतीय शेतकरी हा संकटांवर मात करून पुन्हा नव्याने उभा राहण्याची ताकद ठेवतो.

परंतु प्रत्येक संकटामध्ये एक संधीही दडलेली असते. आज कृषी विज्ञानाने धान लागवडीसाठी अनेक आधुनिक, शास्त्रीय आणि उत्पादनक्षम तंत्रज्ञान विकसित केले आहे. या तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास उत्पादन वाढविणे, खर्च कमी करणे आणि शेती अधिक फायदेशीर बनविणे पूर्णपणे शक्य आहे. बदलत्या काळात विज्ञानाची साथ हीच शेतीच्या प्रगतीची खरी गुरुकिल्ली ठरत आहे. धान उत्पादनात घट होण्याची प्रमुख कारणे म्हणजे उशिरा होणारी रोपणी, निकृष्ट किंवा प्रक्रिया न केलेले बियाणे, रोग-किडींचा प्रादुर्भाव, तणांचे वाढते प्रमाण, असंतुलित खतांचा वापर आणि पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन. ही सर्व कारणे आपण योग्य नियोजन आणि वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करून सहज दूर करू शकतो.

योग्य कालावधीत लागवड करणे, आपल्या भागासाठी शिफारस केलेल्या सुधारित वाणांची निवड करणे, पेरणीपूर्वी बियाण्यांवर प्रक्रिया करणे, योग्य अंतरावर रोपांची लागवड करणे, संतुलित सेंद्रिय व रासायनिक खतांचा वापर करणे, वेळेवर तण नियंत्रण करणे आणि पाण्याचे काटेकोर नियोजन करणेया साध्या वाटणाऱ्या उपाययोजना उत्पादनात मोठी वाढ घडवून आणतात.

योग्य वेळी घेतलेला प्रत्येक निर्णय शेतकऱ्याच्या उत्पन्नात सकारात्मक बदल घडवून आणू शकतो.

विशेषतः श्री (SRI System of Rice Intensification) ही आधुनिक लागवड पद्धत धान शेतीत एक क्रांती घडवून आणणारी ठरत आहे. या पद्धतीत कमी बियाणे, कमी पाणी, अधिक फुटवे, मजबूत मुळे, भरघोस कणसे आणि पारंपरिक पद्धतीपेक्षा लक्षणीय अधिक उत्पादन मिळते. त्याचबरोबर मजुरीचा आणि उत्पादन खर्चाचाही मोठ्या प्रमाणात बचत होते. आज अनेक प्रगतशील शेतकरी या पद्धतीचा अवलंब करून उत्कृष्ट आर्थिक यश मिळवत आहेत. ही पद्धत केवळ उत्पादन वाढवत नाही, तर शेतकऱ्याच्या आत्मविश्वासालाही नवी उभारी देते. याशिवाय पेरसाण पद्धत, जपानी लागवड, ड्रम सीडरचा वापर, सुधारित रोप व्यवस्थापन, सेंद्रिय खतांचा अधिक वापर, हिरवळीच्या खतांचा समावेश आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचे संतुलित व्यवस्थापन यामुळे मातीचे आरोग्य सुधारते. निरोगी माती म्हणजे निरोगी पीक, आणि निरोगी पीक म्हणजे अधिक उत्पादन. मातीची सुपीकता टिकवून ठेवणे म्हणजे पुढील अनेक पिढ्यांसाठी समृद्धीची बीजे पेरणे होय.

धान हे पाण्यावर आधारित पीक असले तरी सतत पाणी साचवून ठेवणे आवश्यक नसते.

योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पाणी दिल्यास पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते. यामुळे उत्पादनावर सकारात्मक परिणाम होतो आणि नैसर्गिक संसाधनांचेही संरक्षण होते. आजच्या बदलत्या हवामानात पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे हीच भविष्यातील शेतीची गुरुकिल्ली आहे. शेतकरी बंधूंनो, आज माहितीचे युग आहे. कृषी विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठे, कृषी विभाग, प्रगतशील शेतकरी आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा लाभ घेऊन आपण आपल्या शेतीत मोठा बदल घडवू शकतो. परंपरेचा अभिमान ठेवत विज्ञानाची साथ घेतली तर शेती अधिक सक्षम, टिकाऊ आणि नफ्याची होईल. आजचा शेतकरी फक्त कष्टकरी नसून तो संशोधकही आहे. प्रत्येक हंगाम त्याला काहीतरी नवीन शिकवतो. अपयशातून अनुभव, अनुभवातून ज्ञान आणि ज्ञानातून यश मिळते. म्हणूनच बदल स्वीकारण्याची तयारी ठेवणारा शेतकरीच उद्याचा यशस्वी शेतकरी ठरेल.

लक्षात ठेवा धानाचे प्रत्येक रोप तुमच्या कष्टांचा साक्षीदार आहे. प्रत्येक कणसात तुमच्या घामाचा सुवास आहे. प्रत्येक दाण्यात तुमच्या कुटुंबाच्या स्वप्नांचे भविष्य दडलेले आहे. म्हणून शेतीकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून पाहू नका; ती एक उद्योग आहे, विज्ञान आहे आणि समृद्धीकडे नेणारा सर्वात विश्वासार्ह मार्ग आहे. आजचा काळ हा आधुनिक शेतीचा आहे.

जो शेतकरी विज्ञानाचा हात धरतो, तोच काळाच्या पुढे जातो. आधुनिक लागवड तंत्रज्ञान, सुधारित वाण, संतुलित खत व्यवस्थापन, पाण्याचा काटेकोर वापर आणि योग्य नियोजन यांच्या बळावर धान शेती अधिक उत्पादनक्षम, अधिक फायदेशीर आणि अधिक शाश्वत होऊ शकते.

आज घेतलेला एक वैज्ञानिक निर्णय उद्याच्या अनेक संकटांपासून आपले संरक्षण करू शकतो. आज केलेली आधुनिक शेती उद्या आपल्या मुलांचे शिक्षण, कुटुंबाचे सुख आणि आर्थिक सुरक्षिततेचा मजबूत पाया ठरू शकते. कारण शेतीतील प्रत्येक योग्य निर्णय हा केवळ उत्पादन वाढवत नाही, तर शेतकऱ्याचा आत्मविश्वासही वाढवतो. लक्षात ठेवा कर्जमुक्तीचा मार्ग केवळ कर्जमाफीत नसतो; तो भरघोस उत्पादनात, कमी उत्पादन खर्चात, शास्त्रशुद्ध शेतीत आणि योग्य नियोजनात असतो. जेव्हा शेतातील प्रत्येक एकर अधिक उत्पादन देईल, प्रत्येक कणसाला योग्य बाजारभाव मिळेल आणि प्रत्येक हंगाम नफ्याचा ठरेल, तेव्हाच शेतकरी खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल. कर्जाचे ओझे हलके होईल,

मुलांच्या शिक्षणाची स्वप्ने पूर्ण होतील, कुटुंबाच्या चेहऱ्यावर समाधान फुलेल आणि शेतकऱ्याचा स्वाभिमान नव्या उंचीवर पोहोचेल.

चला यंदाच्या खरीप हंगामात एक नवा संकल्प करूया. आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारूया, शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊया, धानाचे भरघोस उत्पादन घेऊया आणि आपल्या कष्टाला समृद्धीची नवी दिशा देऊया. प्रत्येक शेत हिरवेगार बहरो, प्रत्येक कणसात सोन्यासारखे धान भरू दे, प्रत्येक शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलू दे आणि प्रत्येक कुटुंब कर्जमुक्त, स्वाभिमानी व समृद्ध होऊ दे हीच मनःपूर्वक सदिच्छा.

**-रणजितसिंह राजपूत,**
**जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार**



## बदलते तंत्रज्ञान

# रिव्हर्स ऑस्मोसिसचे पाणी पिणे योग्य आहे का?

टीडीएस, खनिजे आणि पाण्याचा अपव्यय यांचा विचार करूनच आरओ निवडा. आजकाल जवळपास प्रत्येक घरात आरओ फिल्टर दिसतो. नळाचे पाणी स्वच्छ करण्यासाठी हे सोयीचे साधन झाले आहे, मात्र आरओचे पाणी आरोग्यासाठी खरोखरच चांगले आहे का, असा प्रश्न अनेकांना पडतो. याबाबत जलतज्ज्ञ डॉ. स्वाती मोरे माहिती देतात.




आरओ म्हणजेच रिव्हर्स ऑस्मोसिस हे तंत्रज्ञान पाण्यातील विरघळले क्षार, जड धातू, क्लोरीन, कीटकनाशके आणि सूक्ष्मजंतू ९५ टक्क्यांपर्यंत काढून टाकते. ज्या भागात पाण्याचा टीडीएस ५०० पीपीएमपेक्षा जास्त आहे, पाणी खारट, खडबडीत किंवा रंग-वास असले आहे, तिथे आरओ आवश्यक ठरतो. मुंबई, पनवेलसारख्या काही भागात महापालिकेचे पाणी तुलने स्वच्छ असते, पण बोअरवेल किंवा नदीकाठच्या भागात टीडीएस जास्त असतो, मात्र आरओचा एक मोठा तोटा म्हणजे तो फक्त घाणच नाही तर कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियमसारखी शरीराला आवश्यक खनिजेही काढून टाकतो. सतत खनिजविरहित पाणी प्यायल्याने थकवा, हाडे कमकुवत होणे आणि पचनाच्या तक्रारी होऊ शकतात. म्हणूनच तज्ज्ञांच्या मते पिण्याच्या पाण्यातील टीडीएस ८० ते १५० पीपीएमदरम्यान असणे आदर्श आहे. ही समस्या लक्षात घेऊनच आजकाल आधुनिक आरओमध्ये टीडीएस कंट्रोलर आणि मिनरल कार्ट्रिज देण्यात येतात. ही प्रणाली फिल्टर झालेल्या पाण्यात आवश्यक खनिजे पुन्हा मिसळते.

त्यामुळे पाणी केवळ स्वच्छच नाही तर आरोग्यदायीही राहते.जर तुमच्या भागात महापालिकेचे पाणी येते आणि त्याचा टीडीएस २०० ते ३० च्या दरम्यान आहे, तर फक्त UV किंवा UF फिल्टरही पुरेसा ठरू शकतो. UV जंतू मारतो आणि UF गाळ व बॅक्टेरिया काढतो, पण खनिजे टिकवून ठेवतो. आरओचा दुसरा मुद्दा म्हणजे पाण्याचा अपव्यय. एक लिटर शुद्ध पाण्यासाठी आरओ जवळपास तीन लिटर पाणी वाया घालवतो. हे ७० टक्के वाया जाणारे पाणी घाण नसते. ते भांडी धुणे, गाडी पुसणे, झाडांना पाणी देणे यासाठी वापरता येते. त्यामुळे पाणी वाचवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. थोडक्यात पाणी खरेदी करण्यापूर्वी तुमच्या भागातील पाण्याची टीडीएस आणि बॅक्टेरिया तपासणी करून घ्या. टीडीएस जास्त असेल तरच आरओ + मिनरल कार्ट्रिज निवडा.

# प्रसिद्ध गीतकार शांताराम नांदगावकर

हृदयी वसंत फुलताना... यांसारखी सतत ओठावर खिळणारी गाणी देऊन रसिकांना उत्साहात ठेवणारे गीतकार म्हणून कवी शांताराम नांदगावकर यांची ओळख होती. सहज आणि सुंदर शब्दांची गुंफण असणाऱ्या आणि मनाचा ठाव घेणारी गीते देणारे ज्येष्ठ गीतकार शांताराम नांदगावकर हे मूळचे कोकणातील नांदगावचे. त्यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९३६चा, तर शालेय शिक्षण दादरच्या शिरोडकर हायस्कूलमध्ये झाले. आज त्यांचा स्मृतिदिन...



## निमित्त

'पाहिले न मी तुला', 'प्रथम तुला वंदितो', 'ही नव्हे चांदणी', 'दाटून कंठ येतो', आदी त्यांची गीते विशेष गाजली. अष्टविनायक,'नवरी मिळे नवऱ्याला', 'बनवा बनवी', पैजेचा विडा आदी मराठी तसेच हिंदी चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केले होते. श्रोत्यांच्या ओठावर खेळतील अशा सहजसुंदर काव्यरचना हे त्यांचे वैशिष्ट्य होते. चित्रपटगीतांबरोबरच बालगीते, भावगीते व लोकगीतेही आणि भक्तीगीतेही लिहिली. 'ससा तो ससा' हे बालगीत आजही मुलांना वेड लावते.

शब्दांमधून जग आणि जगाची रीत उभी करण्याची मोठी ताकद त्यांच्यात होती, परंतु दुर्दैवाने त्यांच्या बहराचा काळ हा मराठी चित्रपट गीत-संगीताच्या दृष्टीने अधोगतीचा होता. त्यामुळे अनेकदा 'बिनडोक' सिच्युएशन्ससाठी गाणी लिहिण्याचे 'व्यावसायिक काम' त्यांना करावे लागले. तरीही जेव्हा केव्हा संधी मिळाली तेव्हा तेव्हा त्यांनी गीतकार म्हणून आपल्या क्षमतेचा प्रत्यय आणून दिला. गीतकार म्हणून त्यांचा प्रवास भावगीताच्या प्रांतात सुरू झाला, तेव्हा चित्रपटसृष्टीत ग.दि., सुधीर फडके, राम कदम, जगदीश खेबुडकर ही समीकरणे ऐन भरात होती.

यानंतरच्या पंधरा वर्षांत सर्व काही बदलले. या दरम्यान नांदगावकर यांनी भावगीतांच्या प्रांतात मुशाफिरी केली. 'रामप्रहरी राम गाथा'सारखे त्यांचे गाणे पूर्वसूरींशी आणि मराठी भक्तीगीतांच्या सुरेल परंपरेशी नाते सांगणारे होते. १९८०नंतरचा जवळपास दोन दशके मराठी चित्रपट उथळ पाण्यात गटांगळ्या खात होता. नांदगावकर नेमके याच काळात गीतकार म्हणून वावरत होते. १९७९ साली 'अष्टविनायक' या चित्रपटात गाणी लिहून ते खऱ्या अर्थाने 'मेन स्ट्रिम'मध्ये आले, परंतु त्यांनी चित्रपटाबाहेर जशी गाणी लिहिली, उदाहरणार्थ, 'सजल नयन नितधार बरसती', 'रुपेरी वाळूत माडांच्या बनात' तशी त्यांना चित्रपटात लिहिण्याची संधी क्वचितच मिळाली.

संगीतकार अनिल-अरुणसोबत त्यांची 'वेव्हलेंग्ध' चांगलीच जुळली, 'गंमत जंमत'साठी किशोरकुमार यांना मराठी गाणे द्यायचे ठरले, तेव्हा मराठीतल्या 'ळ'चा उच्चार करता येत नाही आणि 'च'चा उच्चार आपण 'च्य' असा हिंदी पद्धतीने करतो, असे कारण सांगून ते गाण्यासाठी राजी होईनात, पण ही अडचण आव्हान म्हणून स्वीकारत नांदगावकर यांनी, 'प्रिये, जगू कसा तुझ्याविना मी राणी गं' अशी सोपी शब्दरचना केली आणि किशोर कुमार यांनी धमाल उडवून दिली. गाणं अतिशय लोकप्रिय झाले.

शांताराम नांदगावकर १९८५मध्ये विधान परिषदेवर निवडून गेले होते. त्यांचे ११ जुलै २००९ रोजी निधन झाले.

**-संजीव वेलणकर**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुळशीचे पाणी पिण्याचे अमृतासमान फायदे

प्राचीन काळापासून एक पवित्र वनस्पती म्हणून दारी राहणाऱ्या तुळशीला विशेष मान आहे. तुळशीचे औषधी गुणधर्मसुद्धा अनेक आहेत. अगदी रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापासून ते श्वसनाच्या समस्या सोडवण्यापर्यंत अनेक प्रश्नावर तुळशीचे सेवन हे रामबाण उपाय ठरते.



तुळशीला डप्टोजेन मानले जाते, याचा अर्थ तुळस शरीराला तणावाशी जुळवून घेण्यास आणि संतुलन राखण्यास मदत करते. तुळशीमध्ये इम्युनोमोडचुलेटरी गुणधर्मदेखील असतात, याचा अर्थ ते शरीराची रोगप्रतिकारक प्रतिक्रिया वाढवू शकते. हे गुणधर्म संक्रमण आणि आजारांपासून लढण्यास मदत करू शकतात.

**तणावावर नियंत्रण**

तुळशीचे पाणी शरीराला शांत करू शकते, अंतर्गत हालचालींची लय संतुलित राहते. त्यामुळे ज्यांची जीवनशैली फार तणावग्रस्त आहे त्यांनी दिवसातून एकदा हे तुळशीचे पाणी प्यायल्यास फायदा होऊ शकतो.

**पचनाला मदत**

तुळशीमध्ये कार्मिनेटिव गुणधर्म असतात जे गॅस आणि सूज कमी करण्यास मदत करू शकतात. काही अभ्यासांमध्ये असेही सुचवले आहे. यामुळे आतड्याचे कार्य सुधारू शकते, पचनास मदत होते.

**श्वसनासाठी मदत**

वर्षानुवर्षे तुळशीच्या पानांचा वापर खोकला, सर्दी आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या दूर करण्यासाठी केला जात आहे. तुळशीमध्ये कफनाशक गुणधर्म असतात, कफ बाहेर टाकण्यास आणि रक्त साचून गुठळ्या होण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत करतात. तुळशीचे दाहकविरोधी गुणधर्म घसा खवखवणे किंवा जळजळणाऱ्या श्वसननलिकेस शांत करू शकतात.

**अँटिऑक्सिडंटचा पॉवरहाऊस**

तुळशीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल्ससारखे विविध अँटिऑक्सिडंट्स असतात. हे अँटिऑक्सिडंट्स शरीरातील मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानाशी लढण्यास मदत करतात. तुळशीच्या पाण्याचे सेवन केल्याने शरीराला आवश्यक अँटिऑक्सिडंट्सचा पुरवठा वाढू शकतो ज्यामुळे अनेक आजरांपासून संरक्षण मिळू शकते. याविषयी अजून सविस्तर संशोधन होण्याची गरज आहे.

# सभापती वैकुंठ पाटील यांचा नागोठण्यात पाहणी दौरा



**नागोठणे : बातमीदार**

अंबा नदीला सलग तीन वेळा आलेल्या पुरामुळे नागोठणे शहर व परिसरातील व्यापारी, नागरिक आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती वैंकुठशेठ पाटील यांनी शुक्रवारी दुपारी नागोठणे शहरातील पूरग्रस्त भागाचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेतला.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झालेल्या या दौऱ्यात त्यांनी बाजारपेठ, कोळीवाडा, मोहल्ला, खुमाचा नाका आदी भागांना भेटी देत व्यापारी व नागरिकांशी संवाद साधला. नुकसानीचे पंचनामे, मदतकार्य व इतर बाबींची माहिती घेत त्यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पंचनाम्यांच्या कामकाजाचाही आढावा घेतला.

पूरानंतर निर्माण झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येची दखल घेत वैकुंठशेठ पाटील यांनी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर चर्चा करून तातडीने पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. तसेच परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत घटनास्थळी उपस्थित राहण्याचे निर्देश रोहा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी अमृता उंद्रेपाटील यांना दिले.

यावेळी राष्ट्रवादीचे नेते व रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य किशोरभाई जैन, राष्ट्रवादीचे विभागीय नेते नरेंद्रशेठ जैन, भाजप नेते किशोरभाई म्हात्रे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सोपनभाऊ जांबेकर, श्रेया कुंटे, नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य डॉ मिलिंद धात्रक, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे, राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, भाजपचे सचिन मोदी, भाजप रोहा ता. सरचिटणीस आनंद लाड, अशोक अहिरे, निखिलशेठ मढवी, बंटी मांडे, दिलीप शहासने, तीरथ पोलसानी, मोरेश्वर म्हात्रे, गणेश घाग, विजय शहासने, कृषी अधिकारी रणजीत लवटे आदींसह महसूल खात्याचे कर्मचारी, व्यापारी व नागरिक यावेळी उपस्थित होते. यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, महसूल विभागाचे कर्मचारी, व्यापारी व नागरिक उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती परीक्षेत डॉ. रामहरी धोटे शिशुमंदिरच्या विद्यार्थिनीचे यश

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) मध्ये खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. रामहरी धोटे शिशु मंदिर, खोपोली येथील विद्यार्थिनी कु. शब्दा सतीश पंडित हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सध्या इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या कु. शब्दा पंडित हिने शिष्यवृत्ती परीक्षेत ६२.४ टक्के गुण मिळवत शिष्यवृत्तीसाठी पात्रता प्राप्त केली आहे. तसेच शहरी सर्वसाधारण गटाच्या गुणवत्ता यादीत तिने ८३ वा क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

कु. शब्दा हिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विजय चुरी, मुख्याध्यापिका सुनिता चव्हाण, माध्यमिक पर्यवेक्षिका. हेमलता देशमुख, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशामागे शिक्षिका प्रज्ञा आगाशे, रश्मी नटे आणि. तृप्ती पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याची भावना शाळेच्या वतीने व्यक्त करण्यात आली. विद्यार्थिनीच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळा व खालापूर तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## अंध-अपंगांना ब्लँकेट, छत्री, रेनकोट वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात कार्य करणाऱ्या राधा मीरा ट्रस्टकडून अंध अपंग यांना रेनकोट, ब्लँकेट आणि छत्र्यांचे वाटप केले जाते. कल्याणपासून खोपोलीपर्यंतच्या १२०० अंध अपंग यांना छत्र्या वाटप करण्यात आल्या.

राधा मीरा चॅरिट्रबल ट्रस्ट यांच्या माध्यमातून अंध, अपंगांना रेनकोट, ब्लँकेट आणि छत्री वाटप कार्यक्रमाचे आयोजन कर्जत येथील आंबे माता हॉल येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ट्रस्टचे अध्यक्ष भरत मेहरा यांच्या माध्यमातून दरवर्षी असा उपक्रम केला जातो. यावर्षी मुंबई, ठाणे, अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर, वांगणी आणि कर्जत तालुका तसेच खोपोली येथील १२०० लाभार्थी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वांगणी तर्फे वाजे तहसील-पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री संतोष गोविंद घरत, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणेः-

**शेतजमीन वर्णन**

**मौजे वांगणी तर्फे वाजे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांत्ते अधीकार क्षेत्रातील.**

| गट कमांक व उपविभाग | क्षेत्र | | | आकार रु. पै |
|---|---|---|---|---|
| | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | |
| १३७ | ०-३१-३० | ०-०१-३० | ०-३२-६० | ६.२१ |

वरील बिनशेती मिळकती या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १०/०७/२०२६**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी. ए.एल. एल. बी**

कार्यालयीन पत्ता :- गाळा क. १५४ महानगरपालीका कॉम्पलेक्स तहसिलदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६., संपर्कः- ८८८८२७१७५९

### जाहीर नोटीस

सर्व व्यक्तीस/लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, श्री. दिपक मारुती नाईक, यांचे मालकी हक्क, ताबेकब्जा आणि वापरातील मौजे-पोही, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत, आमचे अशिल १) श्री. कमलाकर आंबो म्हात्रे, २) श्री. रामकमल कमलाकर म्हात्रे, यांनी खरेदीखताने कामयस्वरुपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-पोही, तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पध्दती | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ४३/१ | भोगवटादार वर्ग-१ | १०-९४-०० क्षेत्र<br>१-४५-०० पो.ख. | २३.३८ पैकी<br>पैकी |
| | | १२-३९-०० | ८.८५ |

वर नमूद मिळकतीचे एकूण क्षेत्र १२-३९-०० हे.आर.चौ.मी. पैकी श्री. दिपक मारुती नाईक यांच्या हिश्श्याचे ४-१४-०० हे.आर.चौ.मी. एवढे क्षेत्र सदर नोटीशीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असणाऱ्या मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **२१ दिवसांचे आत** आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात. सदर २१ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**दिनांक : १०/०७/२०२६**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**शरद रामचंद्र जाधव,**
वकील (बी.कॉम. एलएल.बी.)
नोंदणी क्र. एम् ए एच-३५८६/२००८
कार्यालयीन पत्ताः कार्यालय क्र. ००१, तळमजला, रॉयल प्राईड, भुखंड क्र. ११३, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६

### e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend. 18/26-27<br>**RFX**<br>**7000040586** | Work of providing and fixing of 200 W LED flood lights IP 65 on existing high mast towers for yard lighting at various substations under EHV (O&M) Circle, Panvel.<br>**Tender Fee: Rs. 500/-+ GST.** | **Rs. 77,34,882/-**<br>including taxes |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 09.07.2026 at 11:00 Hrs. to 24.07.2026 up to 11:00 Hrs., Opening date: 24.07.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
**Mobile No.** 8412050202 **E-mail ID:** se7200@mahatransco.in

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**

### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-16/26-27/<br>Rfx No.7000040709 | Electrification work of TYPE IV staff quarter at 400 kV Nagothane s/s under 400 kV R.S. O&M Division, Nagothane | **Rs. 10,23,381.69 /-** | **26.07.2026 up to 23.59 hrs** |

**EMD Rs.** 1% of Estimate cost, Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** **Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

### नमुना एन. डी.
### (नियम ९२ (३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH 06 AZ0675 चे मालक शैलेश गडरिया यांचे दि. २४/०२/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी, धर्मिष्टा गडरिया ,रिध्दी सिध्दी रेझिडेन्सी फ्लॅट नं बी ७०२ प्लॉट नं ५३/५३ अे से.३. न्यू पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल / प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल महानगरच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव :** धर्मिष्टा गडरिया
पत्ता : रिध्दी सिध्दी रेझिडेन्सी प्लॉट नं बी ७०२ फ्लॅट नं ५३/५३ अे से.३. न्यू पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

### मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना
### १९३ श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती
### जाहीर सूचना

**संदर्भ :-**
१. महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक लवेसू २०२५/प्र.क्र.०२/ पाणंद रस्ते दि. १४/१२/२०२५
२. महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन शुध्दीपत्रक क्रमांकः लवेसू २०२५/प्र.क्र. ०२/(E१४५२७१०) पाणंद रस्ते दि.१८/०२/२०२६
३. महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांकः लवेसू-२०२५/प्र.क्र.०२ (६१४५२७१०) पाणंद रस्ते दि. १८/०२/२०२६

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक लवेसू २०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते दि.१४/१२/२०२५ अन्वये रायगड जिल्हयाकरीता विधानसभा क्षेत्रातील मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना २०२६-२७ करीता दर निश्चित करण्यासाठी विधानसभा क्षेत्र निहाय यंत्रसामुग्रीचे (यंत्रसामुग्री इंधन मनुष्यबळ) प्रति तासिका दर ई-निविदाद्वारे खाजगी यंत्रसामुग्री धारकाकडून दर मागविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने निविदामध्ये प्राप्त न्युनत्तम दराला जिल्हास्तरीय समितीद्वारे प्राप्त मंजूरी सोबत जोडलेल्या सहपत्र क्र.१ मध्ये नमूद केलेले आहे.

महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन शुध्दीपत्रक क्र.लवेसू २०२५/प्र.क्र.०२ (E-१४५२७१०)/पाणंद रस्ते दिनांक २५ मार्च २०२६ अन्वये "जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेले तांत्रिक अर्हता (Technical Qualification) व अंतिम केलेला प्रति तास दर (L१ Rate) (सहपत्र १ प्रमाणे) आधारभुत मानून कंत्राटदार, १९३ श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रामध्ये काम करण्यास इच्छुक असेल त्या पात्रताधारक कंत्राटदाराने योग्य व आवश्यक दस्ताऐवजासह निविदा फि रूपये १०,०००/- चा धनाकर्ष (Demand Draft) व रूपये १५.०० लक्ष चा FDR "SDO SHRIWARDHAN CM BALIRAJA FARM PANAND ROAD SCHEME" यांच्या नावे जमा करून नामनिर्देशन (Empanelment) करीता आवेदन पत्र दिनांक १३/०७/२०२६ ते दिनांक २७/०७/२०२६ या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेमध्ये उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन, उपविभाग श्रीवर्धन, जि. रायगड या ठिकाणी मागविण्यात येत आहे.

**सही/-**
**(महेश पाटील)**
**उपविभागीय अधिकारी**
**श्रीवर्धन उपविभाग श्रीवर्धन**

### मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना २०२६-२७
### सहपत्र १

संदर्भ :- १. महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक लवेसू २०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १४/१२/२०२५

**यंत्रसामुग्रीचे जिल्हा स्तरीय समितीद्वारे मंजुर केलेले दर (प्रतितास)**

| अनु क्र. | मशिनरीचे नाव | जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेले दर (प्रति तास र.रु.) |
|---|---|---|
| १ | 70 HP JCB | 4500/- |
| २ | 200 HP Poclain | 13220/- |
| ३ | 8 ते 10 Ton Static Roller | 3700/- |
| ४ | Vibratory Roller | 5980/- |

**Is NP ३ Hume Pipe चे मंजुर केलेले दर (प्रती Rmt.)**

| अनु क्र. | Is NP ३ Hume Pipe | जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेले दर (प्रतिमीटर कार्यस्थळी पुरविण्याचे दर र.रु.) |
|---|---|---|
| १ | 1200 mm | 7500/- |
| २ | 900 mm | 6500/- |
| ३ | 800 mm | 4500/- |
| ४ | 600 mm | 3000/- |
| ५ | 450 mm | 2500/- |

**PCC grade M १० Concrete चे मंजुर केलेले दर (प्रती Cum.)**

| अनु क्र. | M १० Concrete | जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेले दर (प्रति घनमिटर दर (फॉर्म, वर्क, कास्टिंग, क्युरिंग, रॉयल्टी व जीएसटी सह एकत्रित दर) र.रु.) |
|---|---|---|
| १ | Nominal Mix 1:3:6 (Hand Mixing) Concrete/Cum | 7020/- |

### मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना २०२६-२७
### सहपत्र २

संदर्भ :- १. महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे शुध्दीपत्रक क्रमांकः लवेसू २०२५/प्र.क्र. ०२/(E१४५२७१०) पाणंद रस्ते दि. १८/०२/२०२६
२. महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांकः लवेसू -२०२५/प्र.क्र. ०२ (E१४५२७१०) पाणंद रस्ते, दि.१८/०२/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याबाबतचा पुरावा | |
| २ | सन 2023-24, 2024-25 व 2025-26 या वर्षातील आयकर भरल्याचा दाखला | |
| ३ | सन 2023-24, 2024-25 व 2025-26 या वर्षातील जी.एस.टी. भरल्याचा दाखला | |
| ४ | पॅनकार्ड व जी.एस.टी. नोंदणीची प्रत | |
| ५ | पुरविण्यात येणाऱ्या यंत्रसामुग्रीचे वय 15 वर्षापेक्षा जास्त नसल्याचा पुरावा | |
| ६ | उपरोक्त यंत्रसामुग्री हाताळणाऱ्या मनुष्यबळाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले परवाना तसेच पोलीस यंत्रणेकडून दिलेले चारित्र पडताळणी प्रमाणपत्र | |
| ७ | उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांच्याकडून कामाचे स्वरूप समजून घेतल्याबायत विहीत नमुन्यातील हमीपत्रक | |
| ८ | निविदा फी रक्कम रु.10000/- (अक्षरी रक्कम दहा हजार धनाकर्ष (Demand Draft) *SDO SHRIWARDHAN CM BALIRAJA FARM PANAND ROAD SCHEME* यांचे नावे जमा करावा | |
| ९ | सदर कामाकरीता इसारा रक्कम म्हणुन *SDO SHRIWARDHAN CM BALIRAJA FARM PANAND ROAD SCHEME* यांचे नाव Pledge केलेले रूपये. 15.00 लक्ष किमतीचे FDR | |
| १० | उपरोक्त शासन निर्णयान्वये शासन स्तरावरून वेळोवेळी निर्गमित केलेले अटी व शर्ती लागू राहतील | |

**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/६१/८७०/२०२६**

# नमुंमपाची ऐरोलीत धडक कारवाई

## अनधिकृत झोपड्या, पत्राशेड उद्ध्वस्त



**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली सेक्टर-२ परिसरात उभारण्यात आलेल्या अनधिकृत झोपडपट्ट्या, पत्राशेड, नर्सरी तसेच व्यावसायिक वापरासाठी तयार करण्यात आलेल्या पत्राशेड गाळ्यांवर नवी मुंबई महानगरपालिकेने शुक्रवारी (दि. १०) धडक कारवाई केली. नवी मुंबई पालिकेच्या जी विभाग, ऐरोली कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सेक्टर-२ मधील जागेची पाहणी केल्यानंतर संबंधित अनधिकृत बांधकामांवर कारवाईचे नियोजन करण्यात आले.

सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ही निष्कासन मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या झोपड्या, पत्राशेड, नर्सरी तसेच व्यावसायिक वापरासाठी केलेले पत्राशेड गाळे हटविण्यात आले.

कारवाईसाठी महापालिकेच्या जी विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी व कर्मचारी, १० मजूर, एक जेसीबी, दोन पिकअप व्हॅन तसेच पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शहरातील सार्वजनिक जागांवर होणारी अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात महापालिकेकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे.

# पनवेलमधील पावसाळी पर्यटनस्थळांवर बंदी



**नवीन पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील पावसाळी पर्यटनस्थळांवर जाण्यास पर्यटकांना प्रतिबंधित करण्यात आले आहे. याबाबत आता पोलिसांनी मनाई आदेश काढले आहेत.

पनवेल तालुक्यात पावसाळी पर्यटनस्थळांवर फिरण्यासाठी पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते, मात्र काही पर्यटक अतिरेक करतात आणि आपला जीव गमावतात. या पार्श्वभूमीवर पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील हरिग्राम नदीपात्र, मोरबे धरण परिसर, मोहदर, शांतीवन नदीपात्र, नेरे, गाढेश्वर, धोदाणी नदीपात्र, देहरंग (गाढेश्वर) धरण, कुंडी धबधबा, माची प्रबळ, वारदोली धबधबा, आपटा फाटा, साईगाव या ठिकाणी पर्यटकांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधित करण्यात आले आहे. दरम्यान, या ठिकाणी मनाई आदेशाचे सूचना फलकही लावण्यात आले असून तेथे कोणीही जाऊ नये, असे आवाहन पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजानन घाडगे यांनी केले आहे.

# नवी मुंबईत एसआयआर मोहीम वेगात



**नवी मुंबई : बातमीदार**

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अर्थात एसआयआर सुरू आहे. याअंतर्गत ३० जूनपासून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बीएलओ घरोघरी भेट देऊन गणनापत्रे भरून घेत आहेत. या कामाला आता वेग आला आहे. या कामासाठी नियुक्त बीएलओ यांच्यामार्फत प्रत्येक नोंदीत मतदारास दोन प्रतींमध्ये गणनापत्र देण्यात येत आहे.

या गणनापत्रामध्ये माहिती भरून व स्वाक्षरी करून एक प्रत मतदारांनी बीएलओ यांच्याकडे परत द्यायची आहे. दुसरी प्रत बीएलओची स्वाक्षरी घेऊन पोहोच म्हणून आपल्याकडे ठेवायची आहे. बीएलओ या कामासाठी तीन वेळा प्रत्येक घरी येणार आहेत. काही कुटुंबातील पती-पत्नी दोघेही नोकरी-व्यवसायासाठी बाहेर असल्यास त्यांच्यासाठी ऑनलाइन गणनापत्र भरण्याची महत्त्वाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

https://voters.eci.gov.in/ या सिटीझन सर्व्हिस पोर्टलवर किंवा Voter Helpline ॲप वर जाऊन मतदार घरबसल्या गणनापत्र भरू शकतात. अधिकृत संकेतस्थळावर लॉगिन करून आवश्यक पर्याय निवडावा. संबंधित सेवा निवडून वैयक्तिक व कुटुंबीय माहिती अचूकपणे भरावी. ओळखपत्र, पत्ता पुरावा इ. आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. फॉर्म सबमिट करून अर्जाची पावती जतन करावी. ऑनलाइन फॉर्म भरल्यास संबंधित बीएलओ अधिकारी आवश्यक पडताळणीसाठी संपर्क साधतील.

पुनरावृत्ती टाळून याद्या अचूक करण्यासाठी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नाव अंतिम मतदार यादीत राहण्यासाठी मतदाराने नाव २००२च्या मतदार यादीशी मॅपिंग करून घेणे आवश्यक आहे.

बीएलओंमार्फत २९ जुलैपर्यंत गणनापत्रे संकलित झाल्यानंतर मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात येईल. ५ ऑगस्टला प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. प्रारूप यादीत नाव नसल्यास किंवा हरकत असल्यास ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंत मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे दावे-हरकती दाखल करता येतील.

# एनएससीआय स्कूल सेफ्टी अवॉर्ड्सचा शुभारंभ



**नवी मुंबई : बातमीदार**

देशातील शाळांमध्ये सुरक्षा संस्कृती रुजवून सुरक्षित, सजग आणि जबाबदार भावी पिढी घडविण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या कामगार व रोजगार मंत्रालयाच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या राष्ट्रीय सुरक्षा परिषद, भारततर्फे 'एनएससीआय स्कूल सेफ्टी अवॉर्ड्स' या देशव्यापी उपक्रमाचा गुरुवारी (दि. ९) बेलापूर, नवी मुंबई येथील मुख्यालयात शुभारंभ करण्यात आला.

हा उपक्रम 'विकसित भारत' या राष्ट्रीय संकल्पनेला बळकटी देणारा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. यावेळी राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे महासंचालक डॉ. ललित गभणे यांच्या हस्ते स्कूल सेफ्टी अवॉर्ड्सच्या माहिती पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमासाठी विकसित करण्यात आलेल्या स्कूल सेफ्टी वेबपेजचेही उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. गभणे म्हणाले, "विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच सुरक्षित वर्तन, आपत्तीपूर्व तयारी आणि सुरक्षा जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. सुरक्षिततेची जाणीव असलेली भावी पिढीच विकसित भारताचा मजबूत पाया ठरेल. देशातील सर्व शाळांनी या पुरस्कारांसाठी अर्ज करून सुरक्षित भारताच्या निर्मितीत आपला मोलाचा वाटा उचलावा."

राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे संचालक भगवान भोसले म्हणाले, "या पुरस्कारांच्या माध्यमातून देशभरातील शाळांना विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि डिजिटल सुरक्षिततेसाठी सर्वोत्तम सुरक्षा पद्धती स्वीकारण्याची प्रेरणा मिळेल. पालक, शिक्षक व समाजातील प्रत्येक नागरिकाने उपक्रमाचे ब्रँड ॲम्बेसेडर बनून शाळा सुरक्षित आणि सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा."

कार्यक्रमास राजेश देवघरे, सल्लागार रवींद्र देशमुख यांसह मान्यवर उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संदीप धामोणे, महेश बट्टू, बिपीन कोळी आणि अनघा पाटील यांच्या समन्वयक पथकाने विशेष परिश्रम घेतले. सक्षम व जबाबदार नागरिक घडविणे या उद्देशाने 'एनएससीआय स्कूल सेफ्टी अवॉर्ड्स' महत्त्वाचा उपक्रम ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# गणित मॅरेथॉन स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी



**उरण : रामप्रहर वृत्त**

'मॅथ्स मॅरेथॉन कॉम्पेटिशन फॉर एक्सेलन्स' यांच्यातर्फे इयत्ता ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित राज्यस्तरीय गणित स्पर्धा यंदा सीकेटी विद्यालयात घेण्यात आली. या स्पर्धेत सीकेटी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत शाळेचे नाव उज्ज्वल केले. स्पर्धेत कुमार पल्लव आशिष म्हात्रे याने राज्यस्तरावर तृतीय क्रमांक पटकावला. त्याला चषक, रोख रक्कम आणि प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत विद्यालयातील ३५ विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण कामगिरी केली. त्यांना प्रशस्तिपत्रक आणि पदक देऊन सन्मानित करण्यात आले. या विद्यार्थ्यांना गणित शिक्षिका नीता बालशी, मनीषा पाटील यांच्यासह सर्व गणित शिक्षकांचे विशेष मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, माजी मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी तसेच सर्व शिक्षकांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**सातारा : रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विठ्ठलराव जाधव यांच्या अतीत येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. जाधव कुटुंबीयांनी त्यांचे स्वागत आणि सन्मान केला. यावेळी संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख उपस्थित होते.**

## निवडक

### पोलीस असल्याचे सांगून फसवणूक

**नवीन पनवेल :** पोलीस असल्याची बतावणी करून अंगावरील दागिने काढून घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी इसमांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात ९ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी यांना दोन अनोळखी इसमांनी ते पोलीस असल्याचे सांगितले आणि त्यांच्या अंगावरील दागिने काढून देण्यास भाग पाडले. त्यांना बनावट दागिने देऊन त्यांचे चार लाख ८० हजारांचे सोन्याचे दागिने घेऊन ते पळून गेले.

### लग्न मोडल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** कुटुंबाची बदनामी करून मारहाणीची धमकी आणि लग्न मोडून फसवणूक केल्याप्रकरणी पाच जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात ९ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २४ वर्षीय तरुण खारघर सेक्टर १२ येथे राहत असून फेब्रुवारी ते जून २०२६ रोजी त्यांना सांगोला, सोलापूर येथे लग्नाचे आमिष दाखवले आणि लग्नासाठी एक लाख ३९ हजार रुपये खर्च करायला लावून त्याच्याकडून घेतलेले साहित्य त्याला परत केले नाही. त्याच्यासोबतचे लग्न मोडून पाच जणांनी शिवीगाळ केली आणि कुटुंबाची बदनामी करून मारहाण केली.

### बनावट इन्स्टाग्राम आयडीप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** बनावट इन्स्टा आयडी तयार करून त्यावर फिर्यादीचे फोटो लावून अश्लील शब्दांची पोस्ट टाकणाऱ्या दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात ९ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी मुंबई येथे राहत असून ६ जुलै रोजी आरोपी आस्मा असिफ आणि मुफीज मौलवी यांनी खारघर येथे त्यांना अर्वाच्च शब्दांत शिवीगाळ केली. त्यानंतर ७ जुलै रोजी बनावट इन्स्टा आयडी तयार करून त्यावर फिर्यादीचा फोटो लावला आणि घाणेरड्या अश्लील शब्दांची पोस्ट टाकली.

# सोमवारपासून नवी मुंबई मेट्रो जलद!

**नवी मुंबई : बातमीदार**

सोमवार दि. १३ जुलैपासून सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ वरील बेलापूर-पेंधरदरम्यानच्या मेट्रो सेवेचे सुधारित वेळापत्रक लागू करण्यात येणार आहे. मेट्रो संचालनाचे अधिक कार्यक्षम नियोजन केल्यामुळे प्रत्येक एकेरी प्रवासाचा कालावधी आता एक मिनिट ३० सेकंदांनी कमी होणार असल्याचे सिडकोने सांगितले आहे. दरम्यान, आता सुधारित वेळापत्रकानुसार बेलापूर-पेंधर तसेच पेंधर-बेलापूर हा प्रवास आता २५ मिनिटे ३० सेकंदांत पूर्ण होणार आहे.

# महापौर नितीन पाटील यांचा पनवेल रेल्वेस्थानक पाहणी दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी गुरुवारी (दि. ९) पनवेल रेल्वे स्थानक परिसराचा सविस्तर पाहणी दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी परिसरातील विविध नागरी सुविधा, सुरू असलेली विकासकामे तसेच प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांची होणारी गैरसोय आणि नागरी सुविधांमधील त्रुटी दूर करण्याच्या हेतूने हा दौरा आयोजित करण्यात आला होता. महापौर नितीन पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. स्थानक परिसरातील प्रलंबित कामे वेगाने पूर्ण करून नागरिकांना भेडसावणारे प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा व तातडीची कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक अजय बहिरा, सुमित झुंजारराव, भाजप शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर, प्रवासी वाहतूक संघाचे उपेंद्र मराठे यांसह अधिकारी, नागरिक आणि पदाधिकारी उपस्थित होते.



# एसआयआर अंतर्गत पनवेलमध्ये शनिवार-रविवारी विशेष शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६ कार्यक्रम १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघात सध्या सुरू आहे. या अंतर्गत मतदारांच्या सोयीसाठी ५७४ विधानसभा मतदान केंद्रांवर शनिवार दि. ११ आणि रविवार दि. १२ जुलै रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये बूथ लेव्हल ऑफिसर विधानसभेच्या यादीभागानुसार मतदान केंद्रावर उपस्थित राहणार आहेत. गणना अर्जाचे वाटप आणि संकलन हे शिबिरातच करण्यात येणार आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघातील एकही पात्र मतदार मतदार यादीतून वगळला जाणार नाही यासाठी मतदारांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

यासोबतच ३० जून ते २९ जुलै या कालावधीत पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक घराला बूथ लेव्हल अधिकारी भेट देत आहेत. पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी मंगेश चितळे यांनी नागरिकांनी या उपक्रमाला सक्रिय प्रतिसाद देऊन बीएलओंना आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हे विशेष पुनरीक्षण अभियान राबविण्यात येत आहे. घरभेटीदरम्यान बीएलओंकडून आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी नागरिकांनी योग्य माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

ऑनलाइन voters.eci.gov.in किंवा ECINet Appवर जाऊन स्वतःचा तसेच कुटुंबातील सदस्यांचा मतदार यादीतील तपशील तपासून गणना अर्ज भरावा. शिबिरात शनिवार आणि रविवारी मतदार नेहमी ज्या मतदान केंद्रावर मतदानासाठी जातात त्याच केंद्रावर जाऊन गणना अर्ज भरावा. ज्या मतदाराचे किंवा कुटुंबातील सदस्यांचे नाव मतदार यादीत नसल्यास जन्माचा दाखला, शैक्षणिक प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधार कार्ड किंवा इतर आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत.

# रायगडवासीयांसमोर दूषित पाण्याचे संकट; पुरानंतर जिल्ह्यात जलजन्य आजारांचा धोका

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात आता पावसाने विश्रांती घेतली असली, तरी अतिवृष्टीचे परिणाम अद्याप कायम आहेत. रोहा, नागोठणे, माणगाव, महाड, पेण, आदी भागांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती. अनेक ठिकाणी नद्या, ओढे आणि नाले दुथडी भरून वाहिल्याने घरे, बाजारपेठा आणि पाणीपुरवठ्याचे स्रोत पुराच्या पाण्याखाली गेले. पावसामुळे पाणीचिंता दूर झाली असली, तरी आता दूषित पाण्यामुळे जलजन्य साथीच्या आजारांचे नवे संकट निर्माण झाले आहे.

पूराच्या पाण्यासोबत मोठ्या प्रमाणात गाळ, चिखल, कचरा, सांडपाणी आणि इतर घाण पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांमध्ये मिसळली आहे. अनेक ठिकाणी विहिरी, बोअरवेल, तलाव आणि लहान पाणीपुरवठा योजना पुराच्या पाण्याखाली गेल्या. त्यामुळे या स्रोतांमधील पाणी गढूळ आणि अशुद्ध झाले आहे.



जिल्ह्यातील प्रादेशिक नळपाणी योजना, जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या योजना तसेच ग्रामपंचायतींच्या स्थानिक पाणीपुरवठा व्यवस्थांवरही याचा परिणाम झाला आहे. काही गावांमध्ये नळातून चिखलयुक्त व गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. पाणी शुद्धीकरण केंद्रांवरही अतिरिक्त ताण निर्माण झाला असून, गढूळ पाण्यामुळे शुद्धीकरणाची प्रक्रिया अधिक कठीण झाली आहे.

आरोग्य विभागाच्या दृष्टीने ही परिस्थिती अत्यंत संवेदनशील मानली जाते. अशुद्ध पाण्यामुळे अतिसार, गॅस्ट्रो, कावीळ, टायफॉईड, कॉलरा यांसारख्या जलजन्य आजारांचा धोका वाढतो. पूर ओसरल्यानंतर साथीचे आजार पसरण्याची शक्यता अधिक असल्याने प्रशासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे.

यंदाच्या मुसळधार पावसाने रायगडची पाण्याची चिंता दूर केली असली, तरी पूरानंतर निर्माण झालेले दूषित पाण्याचे संकट अधिक गंभीर ठरत आहे. त्यामुळे प्रशासनाने युद्धपातळीवर पाणी शुद्धीकरण, निर्जंतुकीकरण आणि आरोग्यविषयक उपाययोजना राबविण्याची गरज आहे. त्याचबरोबर नागरिकांनीही सुरक्षित पिण्याच्या पाण्याबाबत आवश्यक खबरदारी घेतल्यास संभाव्य साथीच्या आजारांना आळा घालणे शक्य होणार आहे.

पुरामुळे जलस्त्रोत हे दूषित झाले आहेत. यासाठी जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाने तातडीने जल शुद्धीकरण करावे जेणेकरून नागरिकांना स्वच्छ पाणी मिळेल असा सूचना दिल्या असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले

सर्व पाणीपुरवठा योजनांमध्ये प्रभावी क्लोरीनेशन करावे विहिरी, बोअरवेल, तलाव व सार्वजनिक पाण्याचे स्रोत निर्जंतुक करावेत दूषित पाणीपुरवठा होत असलेल्या भागात सुरक्षित पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करावी आरोग्य विभागाने गावागावांत पाण्याचे नमुने तपासून आवश्यक सूचना जारी कराव्यात संयुक्त जनजागृती मोहीम राबवावी साथीच्या आजारांवर नियंत्रणासाठी वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत.

पिण्याचे पाणी किमान १५ ते २० मिनिटे उकळूनच वापरावे. क्लोरीन गोळ्यांचा किंवा अधिकृत निर्जंतुकीकरण पद्धतीचा वापर करावा. गढूळ किंवा रंग बदललेले पाणी पिणे टाळावे. हातांची स्वच्छता आणि अन्नाची स्वच्छता राखावी. उलट्या, जुलाब, ताप, पोटदुखी यांसारखी लक्षणे आढळल्यास तातडीने शासकीय आरोग्य केंद्रात उपचार घ्यावेत. विहीर किंवा पाण्याचा स्रोत दूषित झाल्याचे आढळल्यास ग्रामपंचायत किंवा संबंधित विभागाला त्वरित कळवावे.

## खोपोलीतील दुर्घटनाग्रस्त कुटुंबाला उपनगराध्यक्ष साबळेंकडून आर्थिक मदत

**खोपोली : प्रतिनिधी**

सतत सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे वरची खोपोली येथे दरड कोसळून श्री. राघो ढुंगणे यांचे संपूर्ण घर क्षणार्धात उद्ध्वस्त झाले. या भीषण दुर्घटनेत श्री. राघो ढुंगणे, त्यांच्या पत्नी सौ. मंगल ढुंगणे आणि मुलगा विजय ढुंगणे हे तिघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या जाखोटिया हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

या दुर्घटनेमुळे ढुंगणे कुटुंबावर दुहेरी संकट कोसळले आहे. घर पूर्णपणे नष्ट झाल्याने निवाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असून, एकाच वेळी तिन्ही जणांच्या उपचाराचा मोठा आर्थिक भार उचलणे त्यांच्या कुटुंबाला शक्य नसल्याचे समजताच खोपोलीचे उपनगराध्यक्ष श्री. विक्रम साबळे यांनी तात्काळ पुढाकार घेत काशी नागरी सहकारी पतपेढी, खोपोली यांच्या सहकार्याने ढुंगणे कुटुंबाला ₹५०,०००/- ची तातडीची आर्थिक मदत सुपूर्द केली.या प्रसंगी डॉ. सतीशजी जाखोटिया, भाजपा आध्यात्मिक समन्वय आघाडीचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ पारठे, काशी नागरी सहकारी पतपेढीचे संचालक . मुस्तुफा दुदूके, ज्येष्ठ नागरिक . शंकरजी पापळ, सामाजिक कार्यकर्ते विनोद सोलंकी, श्री. विनोद रजपूत, मोरेश्वर ढुंगणे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



# खासदार सुनील तटकरेंवर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव






**माणगाव : प्रतिनिधी**

रायगडचे खासदारसुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त तटकरे यांच्या बंगल्यावर पहाटेपासूनच शुभेच्छुकांच्या वाहनांचे ताफे धाव घेत होते. दिवसभर परिसरात उत्साह,जल्लोष आणि कार्यकर्त्यांच्या घोषणांनी एक वेगळेच वातावरण निर्माण झाले होते.

हातात रंगीबेरंगी पुष्पगुच्छ,भव्य पुष्पहार,भेटवस्तू आणि मनापासूनच्या शुभेच्छा घेऊन आलेल्या हजारो कार्यकर्त्यांचे खासदार सुनील तटकरे यांनी अत्यंत नम्रतेने आणि हसतमुखाने स्वागत केले. प्रत्येकाशी काही क्षण संवाद साधत,त्यांच्या कुटुंबाची विचारपूस करत आणि प्रेमाने शुभेच्छा स्वीकारत त्यांनी कार्यकर्त्यांशी असलेले आपले जिव्हाळ्याचे नाते पुन्हा अधोरेखित केले. अनेक कार्यकर्त्यांच्या डोळ्यांत आपल्या नेत्याला भेटल्याचा आनंद स्पष्ट दिसून येत होता.

कार्यक्रमासाठी उभारण्यात आलेल्या भव्य सभामंडपात शुभेच्छा देण्यासाठी इतकी मोठी गर्दी झाली होती की, अनेक तास रांगेत उभे राहूनही कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावरचा उत्साह किंचितही कमी झाला नव्हता. विशाल पुष्पहारांनी खा.तटकरे यांचा सत्कार करण्यात आला. टाळ्यांचा कडकडाट, घोषणांचा गजर आणि जल्लोषाच्या वातावरणात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमात महिलांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. ग्रामीण भागातील महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, व्यापारी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. रायगडसह मुंबई, पुणे, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि राज्याच्या विविध भागांतून कार्यकर्ते आले होते. या वाढदिवसाचे औचित्य साधत विविध राजकीय पक्षांतील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यामुळे हा सोहळा केवळ वाढदिवसाचा न राहता संघटनात्मक बळकटीचेही प्रतीक ठरला.

रायगड जिल्हाभर वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, गरजू नागरिकांना मदत, तसेच विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन अशा लोकहिताच्या कार्यक्रमांनी वाढदिवसाला समाजसेवेची अर्थपूर्ण जोड मिळाली. मुंबई–गोवा महामार्गावर ठिकठिकाणी उभारलेल्या आकर्षक कमानी, झेंडे, बॅनर्स, पोस्टर्स आणि शुभेच्छा फलकांनी संपूर्ण महामार्ग उत्सवाच्या रंगात न्हाऊन निघाला होता. महामार्गावरील प्रत्येक प्रमुख चौक आणि गावातून सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छांचे संदेश झळकत होते. सुतारवाडीकडे जाणारा प्रत्येक रस्ता जणू एका लोकनेत्याच्या जनसंपर्काचा साक्षीदार बनला होता.

कार्यकर्त्यांच्या वाहनांचे ताफे सतत येत असल्याने मुंबई–गोवा महामार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढली होती. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी माणगाव, इंदापूर, कोलाड, लोणेरे आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी शिस्तबद्ध नियोजन करत वाहतुकीचे उत्तम व्यवस्थापन केले.

नियोजनावर मंत्री आदिती तटकरे व आ. अनिकेत तटकरे लक्ष ठेवून होते. आलेल्या मान्यवरांचे स्वागत करत आणि सर्व व्यवस्था सुरळीत सुरू राहील याची काळजी घेत होते.

## रोहा एमआयडीसीतील सीईटीपीचे रासायनिक पाणी शेतात; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव–रोहा एमआयडीसीतील CETPमधील रासायनिक पाणी महापुराच्या पाण्यासोबत वाहून रोठ खुर्द व रोठ बुद्रुकच्या शेतात घुसल्याचा गंभीर आरोप झाला आहे. ६, ७ व ८ जुलैच्या मुसळधार पावसात ही आपत्ती ओढवल्याने उभी पिके, मातीची सुपीकता आणि शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह धोक्यात आला आहे. शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप उसळला आहे.

पुराचे पाणी ओसरल्यानंतर शेतात काळपट, दुर्गंधीयुक्त पाणी, गाळ आणि रासायनिक अवशेष आढळल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. भात, भाजीपाला करपल्यासारखे दिसत असून काही ठिकाणी मातीच नासली आहे. “हे नैसर्गिक संकट नाही, तर औद्योगिक



बेफिकिरीचा थेट फटका आहे,” असा घणाघात शेतकऱ्यांनी केला.

या प्रकरणावर भाजपने आक्रमक पवित्रा घेतला आहे. भाजप धाटाव विभागाध्यक्ष सचिन मोरे, रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे आणि भाजयुमो रोहा तालुकाध्यक्ष नरेश कोकरे आदी उपस्थित होते.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**ई– निविदा सुचना**

**शुध्दीपत्रक–३**

**मलनिःस्सारण विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब–१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार, किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अनु क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा सादर करण्याची पुर्वीची मुदत | निविदा सादर करण्याची मुदतवाढ |
|---|---|---|---|---|
| १ | PMC/ SEWERAGE /०१/२०२६ –२७ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या कामोठे, सेक्टर–३२ येथील ८५ द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया (STP) केंद्रांचे नुतनीकरण करुन दोन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | १) निविदा सादर करण्याचे अंतिम दिनांक–०९/०७/२०२६ रोजी सायं ५:०० वाजता २) निविदा उघडण्याची दिनांक १०/०७/२०२६ रोजी सायं ५:०० वाजता | १) निविदा सादर करण्याचे अंतिम दिनांक–१७/०७/२०२६ रोजी सायं ५:०० वाजता २) निविदा उघडण्याची दिनांक २०/०७/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता शुध्दीपत्रक क्रं.–३ नुसार |

या कामाच्या ई–निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

टीपः वरील बदलांशिवाय टेंडरमधील इतर अटी व शर्ती जशा आहेत तशा राहतील.

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त– I**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.२०४/२१६/२०२६
दिनांक : १०/०७/२०२६



## सिडको

शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूसंपादन विभागातर्फे २२.५% टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना वाटपाबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजुर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४/ MTHL | मौजे–चिर्ले, ता.उरण, जि.रायगड प्रकरण क्र. ०२/२०१३ | ६२/२ पैकी | ०–१०–५० | १७० चौ.मी . | पुष्पक नोड येथील भूखंड क्र. १०इ, सेक्टर २६, क्षेत्र १७० चौ.मी. | श्री. नंदकुमार गजानन अमृते, स्नेहलता गजानन अमृते, दिपाली अनंत अमृते व विनिता विजय अमृते | निरंक |
| | | | एकुण क्षेत्र | ०–१०–५० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :–** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), भूसंपादन विभाग, पहिला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
**सिडको/जनसंपर्क/१४३/२०२६–२७**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in



## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

ई–निविदा सूचना क्र : पमपा/ उद्यान /२२२६/प्र.क्र.०१/३४७/२०२६ दिनांक : १०/०७/२०२६

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची किंमत (GST विरहीत) | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी वार्षिक दराने वृक्ष व रोपांचा पुरवठा, लागवड व संगोपन करणे. | PMC/ Garden /01/ 2026-27 | १२१७२७९१/- | १२१८००/- | १२ महिने |

या कामाच्या ई–निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १०/०७/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त– I**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.२०३/२१५/२०२६
दिनांक : १०/०७/२०२६

# फ्रान्सची उपांत्य फेरीत धडक

## मोरक्कोवर एकतर्फी मात

**फॉक्सबरो : वृत्तसंस्था**

फुटबॉल विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सने मोरोक्कोचा २-०ने धुव्वा उडवत सलग तिसऱ्यांदा उपांत्य फेरीत धडक मारली आहे. फ्रान्सच्या या विजयाचा नायक ठरला तो किलियन एम्बाप्पे. त्याने या स्पर्धेतील आपला आठवा गोल नोंदवला. यानंतर उस्मान डेम्बेले याने दुसऱ्या हाफमध्ये गोल करत फ्रान्सच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.



सामन्याच्या पहिल्या हाफमध्ये एम्बाप्पेला पेनल्टी मिळाली होती, मात्र त्याला गोलमध्ये रूपांतर करता आले नाही. त्यानंतर ६०व्या मिनिटाला बॉक्सच्या बाहेरून शानदार फिनिश करत एम्बाप्पेने फ्रान्सला १-० अशी आघाडी मिळवून दिली. अवघ्या सहा मिनिटांनी, ६६व्या मिनिटाला डेम्बेलेने बॉक्सबाहेरून अप्रतिम गोल झळकावत फ्रान्सची आघाडी २-० अशी भक्कम केली. या विजयासह फ्रान्सने फिफा वर्ल्डकपच्या इतिहासात सलग तिसऱ्या स्पर्धेत उपांत्य फेरी गाठण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला आहे.

सामन्याच्या ६३व्या मिनिटाला मोरोक्कोचा बचावपटू इस्सा डिओपने पाय दिल्याने एम्बाप्पे वेदनेने विव्हळताना दिसला. तरीही तो ७६व्या मिनिटापर्यंत मैदानात खेळत राहिला. अखेर ७७व्या मिनिटाला त्याला मैदानाबाहेर काढण्यात आले आणि त्याच्या जागी जीन-फिलिप मटेटाला मैदानात उतरवण्यात आले. एम्बाप्पेच्या उजव्या घोट्यावर बर्फाची पिशवी लावलेली पाहून चाहत्यांना त्याच्या पुढील सामन्यांतील सहभागाबाबत भीती वाटत होती, मात्र स्वतः एम्बाप्पेने दुखापत किरकोळ असल्याचे स्पष्ट केले. प्रशिक्षक डिडिएर डेशॅम्प्स यांनीही काहीही गंभीर नाही, असे सांगून चाहत्यांना दिलासा दिला आहे.

फ्रान्सचा संघ सध्या शानदार लयीत असून एम्बाप्पेसारख्या सुपरस्टारच्या फिटनेसवर संघाची पुढील वाटचाल अवलंबून असणार आहे. "आराम करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे विजय मिळवणे," अशा जिद्दीने एम्बाप्पेने पुढील आव्हानासाठी फ्रान्स सज्ज असल्याचे संकेत दिले आहेत.

### एम्बाप्पेवर लक्ष केंद्रित

एम्बाप्पेचा हा विश्वचषकातील २०वा गोल ठरला असून तो आता विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत मेस्सीच्या (२१ गोल) केवळ एक पाऊल मागे आहे तसेच सर्वाधिक गोल करण्याच्या शर्यतीत असिस्ट्सच्या जोरावर एम्बाप्पे सध्या 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत आघाडीवर आहे. त्याच्या घोट्याला दुखापत झाल्याने चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, परंतु मी ठीक असून पुढच्या सामन्यांसाठी सज्ज असेन, असे त्याने स्पष्ट केले आहे.

# इंग्लंडचा भारतावर दणदणीत विजय

## चौथी टी-२० जिंकत मालिका घातली खिशात

**ब्रिस्टल : वृत्तसंस्था**

भारताचा इंग्लंड दौरा निराशाजनक ठरला असून चौथ्या टी-२० सामन्यात इंग्लंडने भारताचा तब्बल नऊ विकेट्सनी पराभव करत पाच सामन्यांच्या मालिकेत ३-० अशी अभेद्य आघाडी घेत मालिका जिंकली आहे. या पराभवासह भारताची मालिकेतील पुनरागमनाची आशा संपुष्टात आली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतलेल्या भारताची सुरुवात अत्यंत खराब झाली. अवघ्या सात षटकांत ४८ धावांवर तीन फलंदाज बाद झाले होते, मात्र कर्णधार श्रेयस अय्यर याने संयमी आणि आक्रमक खेळी करत ४९ चेंडूत नाबाद ८० धावा ठोकल्या. त्याच्या खेळीत चार चौकार आणि पाच षटकार होते. अय्यरच्या खेळीच्या जोरावर भारताने २० षटकांत ७ बाद १५८ धावांपर्यंत मजल मारली.

इंग्लंडकडून जोफ्रा आर्चर याने दोन बळी टिपत प्रभावी गोलंदाजी केली. त्याचबरोबर जोश टंग यानेही दोन बळी घेतले, तर विल जॅक्स आणि आदिल रशीद यांनी प्रत्येकी एक विकेट घेत भारताला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखले.



१५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडच्या फलंदाजांनी सुरुवातीपासूनच भारतीय गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. हॅरी ब्रूक याने नाबाद ७९ धावांची, तर फिल सॉल्ट याने नाबाद ५९ धावांची तडाखेबंद अर्धशतकी खेळी केली. या दोघांच्या अविजित भागीदारीच्या जोरावर इंग्लंडने अवघ्या १३.५ षटकांत एकच विकेट गमावत लक्ष्य गाठले आणि नऊ विकेट्सनी शानदार विजय मिळवला.

या विजयासह इंग्लंडने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत ३-० अशी अभेद्य आघाडी घेत ऐतिहासिक मालिका विजय आपल्या नावावर केला आहे.

# व्हॉलीबॉलपटू लक्ष्मी माळीची इंडियन स्कूल फेडरेशन संघात निवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील सावळे गावची सुकन्या आणि पिल्ले स्कूलची इयत्ता बारावी वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी व्हॉलीबॉलपटू लक्ष्मी प्रशांत माळी हिची इंडियन स्कूल फेडरेशनच्या संघात निवड झाली आहे. यासह ती चीन येथे आयोजित होणाऱ्या आयएसएफ वर्ल्ड स्कूल चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.



लक्ष्मीने बदलापूर येथे नुकत्याच झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय चॅम्पियनशिप ट्रॉफीमध्ये मुंबई विभागाच्या संघाचे प्रभावीपणे प्रतिनिधित्व केले होते. विशेष म्हणजे लक्ष्मीने आतापर्यंत दोन वेळा मुंबई विभागाचे प्रतिनिधित्व केले असून तिची अष्टपैलू कामगिरी पाहून राजस्थान येथे झालेल्या नॅशनल फेडरेशन मॅचसाठी आणि मध्य प्रदेशात स्कूल नॅशनल स्पर्धेसाठीही तिची महाराष्ट्र संघात निवड झाली होती.

केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर व्यावसायिक लीगमध्येही लक्ष्मीने आपल्या खेळाची चमक दाखवली आहे. नुकत्याच मेंटल अकॅडमीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र प्रीमियर लीगमध्ये लक्ष्मीची मुंबई नेट दिवस या संघामध्ये निवड झाली होती. लक्ष्मीने शालेय स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत गाजवलेले मैदान आता तिला जागतिक व्यासपीठावर घेऊन गेले आहे.

या यशाबद्दल सावळे ग्रामस्थ, पिल्ले स्कूलचे शिक्षक आणि क्रीडाप्रेमींनी लक्ष्मीचे अभिनंदन केले असून जागतिक स्पर्धेत तिने सुवर्ण कामगिरी करून देशाचा तिरंगा फडकवावा, अशा शुभेच्छा दिल्या आहेत.

# श्रेयस अय्यरची विराटशी बरोबरी

**नवी दिल्ली :** इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने शानदार फलंदाजी करत आपल्या नावावर एक मोठा विक्रम नोंदवला आहे. अय्यरने या सामन्यात नाबाद ८० धावांची खेळी करत इंग्लंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारतीय कर्णधाराने केलेल्या सर्वोच्च धावसंख्येच्या विराट कोहलीच्या विक्रमाची बरोबरी केली आहे.



सामन्याच्या सुरुवातीला भारतीय फलंदाजीचा गडगडलेला पवित्रा पाहता अय्यरची ही खेळी अत्यंत महत्त्वाची ठरली. वैभव सूर्यवंशी (१५), इशान किशन (४) आणि अभिषेक शर्मा (१६) हे तडाखेबंद फलंदाज स्वस्तात माघारी परतल्याने भारताची अवस्था सात षटकांच्या आत तीन गडी बाद ४८ अशी बिकट झाली होती. अशा कठीण प्रसंगी कर्णधार श्रेयस अय्यरने जबाबदारी स्वीकारत डाव सावरला. त्याने शिवम दुबे (२२) सोबत ५३ धावांची भागीदारी करत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले.

# गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंची राज्यस्तरावर चमक

## १० खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदकांची कमाई केली. या जोरावर अकॅडमीचे १० खेळाडू राष्ट्रीय तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

जेजुरी येथे झालेल्या राज्यस्तरीय खुली तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा (सिनियर) तसेच अहिल्यानगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय खुली तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेत (पी-वी, सब-ज्युनिअर, कॅडेट व युथ) गुरूकुल तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी क्योरुगी व पुमसे प्रकारात उत्कृष्ट कामगिरी केली.




राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या खेळाडूंमध्ये तृप्ती सिनलकर, अनुष्का लोखंडे, समृद्धी कापसे, नुपूर पावगे, प्रेम पाटणे, आशिष राडिये, राज जाधव, ओंकार चव्हाण, चैताली नागणे आणि श्रवण भोसले यांचा समावेश आहे. या खेळाडूंनी वैयक्तिक तसेच सांघिक गटांमध्ये सुवर्णपदकांची कमाई करत राष्ट्रीय स्पर्धेतील आपले स्थान निश्चित केले.

याशिवाय मोहित गांधी, दक्ष चोरगे, सिद्धार्थ शाही यांनी विविध वजनी गटात रौप्यपदक, प्रणुषा रावत, तन्विता शिर्के आणि पार्थ पाटील यांनी विविध वजनी गट व पुमसे प्रकारात कांस्यपदके जिंकून अकॅडमीच्या यशात मोलाची भर घातली. गुरूकुल तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंचे या उल्लेखनीय कामगिरीबद्दल कौतुक होत आहे.

# बिग बॅश लीगचा सामना चेन्नईत

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या धर्तीवर ऑस्ट्रेलियात बिग बॅश लीग दरवर्षी खेळवण्यात येते. यंदा या लीगचा शुभारंभाचा सामना चक्क चेन्नईत होणार आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलिया आणि बीसीसीआय यांच्यातील मैत्री दृढ होत असल्याचे यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे.

१२ डिसेंबरला मेलबर्न रेनेगेड्स आणि गतविजेते पर्थ स्क्रॉचर्स हा सामना चेपॉक स्टेडियमवर खेळवला जाईल. या सामन्याच्या आयोजनाला चाहत्यांनी पाठिंबा दिला तर भविष्यात आयपीएलचे काही सामने ऑस्ट्रेलियात खेळवले जाऊ शकतात असे संकेत क्रिकेट ऑस्ट्रेलियाने दिले आहेत. चेन्नईचे चाहते चांगल्या क्रिकेटला पाठिंबा देण्यासाठी नेहमीच मोठ्या संख्येने उपस्थित असतात. त्यामुळेच या सामन्यासाठी चेन्नईची निवड करण्यात आली आहे.

# काउंटी क्रिकेटमध्ये साई किशोर पुनरागमन करणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा डावखुरा फिरकी गोलंदाज आर. साई किशोर पुन्हा एकदा इंग्लंडमध्ये काउंटी क्रिकेट खेळणार आहे. या २९ वर्षीय खेळाडूने २०२६ काउंटी चॅम्पियनशिप हंगामातील शेवटच्या सहा सामन्यांसाठी ग्लॉस्टरशायरसोबत करार केला आहे. तो २० ऑगस्टपासून चेल्टनहॅम येथे वॉर्सेस्टरशायरविरुद्ध होणाऱ्या सामन्यासाठी संघात दाखल होईल.

यानंतर साई किशोर हा ग्लॉस्टरशायरचे प्रतिनिधित्व करत ब्रिस्टल येथे डर्बीशायर आणि मिडलसेक्सविरुद्ध तसेच डरहॅम, लँकेशायर आणि केंटविरुद्ध परदेशातील सामने खेळेल. त्याने तामिळनाडूसाठी ५४ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये २२३ बळी घेतले आहेत, ज्यात १४ वेळा पाच बळी आणि ११ वेळा चार बळींचा समावेश आहे.



यापूर्वी तो २०२५मध्ये सरे संघाकडून काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळला होता, जिथे त्याने डरहॅमविरुद्धच्या विजयादरम्यान स्पर्धेतील आपला पहिला पाच बळींचा टप्पा गाठला होता.

> मला ही संधी दिल्याबद्दल मी प्रशिक्षक जॉन लुईस आणि ग्लॉस्टरशायरमधील सर्वांचा मनापासून आभारी आहे. हा एक समृद्ध इतिहास असलेला क्लब आहे आणि येथील विलक्षण वातावरण मला खूप उत्साहित करते. ग्लॉस्टरशायरची जर्सी घालण्यासाठी, ब्रिस्टल आणि चेल्टेनहॅममधील चाहत्यांना भेटण्यासाठी आणि संघासाठी माझे सर्वोत्तम योगदान देण्यासाठी मी उत्सुक आहे.
>
> **-साई किशोर**

# अफगाणी खेळाडूच्या मुलाची तुफानी खेळी

## १६ षटकारांसह २८ चेंडूंत ठोकले शतक



**काबूल :** आक्रमक फलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेला अफगाणिस्तानचा अष्टपैलू क्रिकेटपटू मोहम्मद नबी याचा मुलगा हसन इसाखिल याने वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत मोठा पराक्रम केला आहे. उझबेकिस्तान आणि अफगाणिस्तान एकादश यांच्यात झालेल्या एकमेव टी-२० सामन्यात हसन इसाखिल याने चौकार-षटकारांची बरसात करत अवघ्या २८ चेंडूत शतक ठोकले.

उझबेकिस्तानविरुद्धच्या लढतीत प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानसाठी हसन इसाखिल याने तुफानी सुरुवात केली. त्याने अवघ्या २८ चेंडूत शतक पूर्ण केले. या डावात त्याने एकूण ३४ चेंडूत १६ षटकार आणि चार चौकारांच्या मदतीने १२० धावा कुटून काढल्या. या खेळीदरम्यान हसनने तब्बल ११२ धावा केवळ षटकार, चौकारांच्या मदतीने बनवल्या, तर केवळ आठ धावा धावून काढल्या.

हसन इसाखिलच्या या शतकी खेळीच्या जोरावर अफगाणिस्तान एकादश संघाने २० षटकात ७ बाद ३२३ धावांचा डोंगर उभारला. या आव्हानाचा पाठलाग करताना उझबेकिस्तानला २० षटकांमध्ये ७ विकेट्स गमावून केवळ १२४ धावांपर्यंतच मजल मारता आली.

# झिम्बाब्वेचा कसोटीनंतर वनडे मालिकेतही बांगलादेशवर विजय

**हरारे : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वे संघाने आपल्या घरच्या मैदानावर इतिहास घडवला आहे. एकमेव कसोटी सामन्यात बांगलादेशचा पराभव केल्यानंतर आता त्यांनी एकदिवसीय मालिकेतही विजय मिळवला आहे. हरारे स्पोर्ट्स क्लबवर खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील दुसऱ्या सामन्यात यजमान झिम्बाब्वेने शानदार कामगिरी करत बांगलादेशचा १३ धावांनी पराभव केला. या रोमांचक विजयासह झिम्बाब्वेने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे.

बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु झिम्बाब्वेने फलंदाजीमध्ये शानदार कामगिरी केली. झिम्बाब्वेच्या संघाने ५० षटकांत सहा गडी गमावून २४७ धावांची मजल मारली. बेन करनने १३५ चेंडूत १११ धावांची उत्कृष्ट खेळी केली. विशेष म्हणजे, त्याने डावाची सुरुवात केली आणि शेवटपर्यंत नाबाद राहिला.

ब्रॅड इव्हान्सने अंतिम षटकांमध्ये त्याला मोलाची साथ दिली. त्याने ३८ चेंडूत दोन चौकार आणि पाच षटकारांसह नाबाद ५८ धावांची खेळी केली, तर सिकंदर रझानेही ३३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली. बांगलादेशकडून तस्किन अहमद आणि मेहदी हसन मिराज यांनी प्रत्येकी दोन बळी घेत सर्वाधिक विकेट्स घेतल्या; याव्यतिरिक्त, नाहिद राणा आणि रिशाद हुसेन यांनी प्रत्येकी एक विकेट मिळवली.



२४८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशच्या तन्झिद हसनने अर्धशतकी खेळी करत विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या, तर तौहीद हृदोयनेही ६० धावा केल्या. शेवटी संघ ४८.१ षटकांत २३४ धावांवर सर्वबाद झाला.

# गौतम गंभीरच्या कोचपदावर गंडांतर?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने काही महिन्यांपूर्वीच सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वखाली खेळताना सलग दुसऱ्यांदा टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या जेतेपदाचा मान पटकावला. त्यानंतर श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात भारतीय संघ आयर्लंडचा सामना करण्यासाठी मैदानात उतरला. या मालिकेत भारतीय संघाचा २-०ने लाजीरवाणा पराभव झाला. त्यानंतर इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत भारतीय संघाला ३-०ने पराभवाचा सामना करावा लागला आहे. आता भारतीय संघावर पुन्हा एकदा व्हॉइटवॉशचे संकट आहे.

भारतीय संघाला गेल्या सहापैकी एकाही सामन्यात विजय मिळवता आलेला नाही. या सुमार कामगिरीनंतर बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार चौथ्या टी-२० सामन्यातील लाजीरवाण्या पराभवानंतर बीसीसीआय भारतीय खेळाडूंच्या कामगिरीवर प्रचंड नाराज आहे. त्यामुळे ही मालिका झाल्यानंतर बीसीसीआय भारतीय खेळाडू आणि कोचिंग स्टाफमधील सदस्यांसोबत तातडीने बैठक घेणार आहे. या बैठकीत खेळाडूंचा आणि कोचिंग स्टाफमधील सदस्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाणार आहे. भारतीय संघाच्या फ्लॉप कामगिरीनंतर गौतम गंभीरच्या मुख्य प्रशिक्षकपदावरही टांगती तलवार आहे. एएनआयच्या वृत्तात सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार गंभीरचे मुख्य प्रशिक्षकपदही धोक्यात आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com